cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–४१ | बुधवार दि.२२ मे २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

संपादकीय

मनसोक्त बरसावा हीच अपेक्षा...

गतवर्षी पावसाने ओढ दिल्याने राज्याच्या बहुतांश भागात पाण्याची टंचाई जाणवत आहे त्यामुळे यंदाच्या मान्सूनच्या वाटचालीकडे प्रत्येकाचे डोळे लागले आहेत. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने मान्सूनच्या आगमनाची दिलासा देणारी बातमी दिली. दक्षिण बंगालचा उपसागर, निकोबार बेटे आणि दक्षिण अंदमान समुद्रात मान्सूनने पुढे वाटचाल सुरू केली आहे.

स्वाती मालीवाल प्रकरणाचा तपास आता एसआयटी करणार

नवी दिल्ली : आम आदमी पार्टीच्या राज्यसभा खासदार स्वाती मालीवाल यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या तपासासाठी आता दिल्ली पोलिसांचे विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आले आहे. दिल्ली पोलिसांचे पथक बिभव कुमार यांच्यासोबत मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी पोहोचले होते. यावेळी उत्तर जिल्ह्याचे अतिरिक्त पोलिस उपायुक्त अंजिता चिपियाना यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, स्वाती मालीवाल प्रकरणात विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांची खरिपासाठी आर्थिक जुळवाजुळव सुरू

» सोयाबीन उत्पादक चिंतेत तर तूर उत्पादकांना दिलासा

पुणे । प्रतिनिधी

शेतीमालाच्या दरावर शेतकऱ्यांचे आर्थिक गणित अवलंबून असते. खरीप हंगामाच्या तोंडावर शेतमालाची आवक वाढली असून, शेतकरी राजा शेतमाल विक्रीतून खरिपासाठी आर्थिक जुळवाजुळव करताना दिसत आहे.

सोयाबीन या मुख्य पिकाने शेतकऱ्यांची निराशा केली असल्याचे दिसत आहे. मात्र तुरीला आणि हरभऱ्याला विक्रमी दर बाजार समित्यांमध्ये मिळत असल्याने शेतकऱ्यांना थोडा दिलासा मिळत आहे.

राज्यातील बाजार समित्यांमध्ये सध्या तूर व हरभरा उत्पादक शेतकरी हर्षउल्हासित असल्याचे पाहायला मिळत आहे. त्याला कारण तसेच असून गेल्या अनेक दिवसांपासून तूर उत्पादक शेतकऱ्यांना प्रति क्विंटलसाठी १२ हजार रुपयांहुन अधिकचा दर मिळत आहे. तर हरभऱ्याला देखील प्रति क्विंटलसाठी ६ हजारांहून अधिकचा दर मिळत आहे. याउलट सोयाबीन उत्पादक शेतकरी मात्र चिंतेत आहेत. कारण सध्या बाजारात सोयाबीनचे दर 'जैसे थे' आहेत. त्यामुळे तुरीचे दर वाढले सोयाबीनचे

दर कधी वाढणार? असा प्रश्न शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, वाढीव दर मिळत असलेल्या तूर उत्पादकांची संख्या मोजकीच आहे. रब्बी हंगामातील हरभरा पिकाचा शेतकऱ्यास दिलासा मिळत असून, असेच दर कायम राहण्याची शेतकरी अपेक्षा करीत आहेत.

◀◀ पान २ वर

सोयाबीनला हमी भावापेक्षाही कमी दर

शेतशिवारत सध्या खरीप हंगामाची लगबग सुरु झाली आहे. मशागतीसह पेरणी, बी–बियाणे यासाठी शेतकऱ्यांचा खर्च होणार आहे. गतवर्षी निसर्गाचा लहरीपणा असतानाही सोयाबीनचे उत्पादन वाढले पण वर्षभरापासून दर नसल्याने शेतकऱ्यांची मोठी अडचण झाली आहे. सोयाबीनला ४ हजार ५०० प्रति क्विंटल अर्थात ४६०० रुपये प्रति क्विंटल या हमीभावापेक्षा कमी दर मिळत आहे. त्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा सूर आहे.

राहुल गांधींची भावूक पोस्ट

नवी दिल्ली : दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांच्या ३३ व्या स्मृतिदिनानिमित्त २१ मे रोजी राजधानी दिल्लीतील 'वीरभूमी' या समाधीस्थळी अनेक मान्यवरांनी भेट देऊन त्यांना भावपूर्ण आदरांजली वाहिली. काँग्रेस नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी विविध उपक्रम राबवून राजीव गांधी यांना श्रध्दांजली वाहिली.

काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, पक्षाध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी राजीव गांधी यांच्या समाधीवर पुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी एक्सवर पोस्ट करुन राजीव गांधी यांना श्रध्दांजली अर्पण केली. याशिवाय देशभरातील अनेक नेत्यांनी राजीव गांधी यांच्या बलिदानाची आठवण काढून

◀◀ पान २ वर

जिंकणार कोण? पंकजाताई मुंडे-बजरंग सोनवणेंवर लागल्या पैजा!

उत्सुकता शिंगेला: शहरासह ग्रामीण भागातील तरुणांनी विजयावरुन लावल्या बोली

विशेष प्रतिनिधी । बीड

लोकसभा निवडणुकीत कोण जिंकणार यावर आता बीड जिल्ह्यात तरुणांनी पैजा लावल्या आहेत. यात पंकजाताई मुंडे यांच्यावर जास्त पैजा लावण्यात आल्याचे समजते. शहरासह ग्रामीण भागातील तरुणांनी मुंडे–सोनवणे यांच्या विजयावरुन पैजेची बोली लावली आहे. यातही आपल्या समाजातील उमेदवारावरुन जास्त पैजा असल्याचे बोलले जात आहे.

बीड लोकसभेची यावेळची निवडणुक चुरशीची ठरली असून मराठा आणि ओबीसी

असा राजकीय संघर्ष पहायला मिळाला. मराठा नेत्यांची फौज पंकजाताई मुंडे यांच्यासोबत असली तरी मराठा समाजातील मतदारांचा मुड मात्र वेगळाच होता. त्यामुळे ही निवडणुक नेत्यांच्या प्रभावाखाली झालीच नाही, म्हटले तर वावगे ठरणार नाही. नेते असूनही पंकजा मुंडे यांना मराठा तरुणांच्या रोषाचा सामना करावा लागला. शेवटी–शेवटी ओबीसी आणि मराठा अशी विभागणी या निवडणुकीत झाल्याचे दिसून आले. मतदार संघात ७०.९२ टक्के मतदान झाले असल्याने व आष्टी मतदार संघात सर्वाधिक ७४.७९ टक्के तर बीडमध्ये सर्वात कमी ६६.०९ टक्के मतदान झाले आहे. आष्टी आणि परळी मतदार संघातून पंकजा मुंडे यांना मताधिक्य मिळेल, असे म्हटले जात असून बीड आणि गेवराई या मतदार संघातून बजरंग सोनवणे यांना आघाडी मिळेल, असे दिसते. तर माजलगाव आणि केज मतदारसंघात कोणाला मताधिक्य मिळेल, याचा अंदाज अद्याप तरी येत नाही.

शहरासह ग्रामीण भागातही कोण विजयी होईल,याविषयी तर्कवितर्क लावण्यात येत असून विजय कोणाचा होईल हे सुध्दा प्रत्येक जण आपापल्या समाजाच्या उमेदवाराचे नाव पुढे करीत असल्याचे दिसते. तर शहरासह ग्रामीण भागातही अनेकांनी कोण विजय होईल, यावरुन पैजा लावल्या आहेत. यातही आपापल्या समाजाच्या उमेदवारालाच पसंती देण्यात आल्याचे दिसते. मात्र मराठा आणि वंजारी समाज सोडता इतर समाजातील लोकांनी सुध्दा मोठ्या प्रमाणात पैजा लावल्या आहेत. त्यात पंकजा मुंडे यांच्या नावावर जास्त पैजा लावल्या असल्याचे बोलले जात आहे.

आष्टी, परळी, केजमध्ये पंकजा मुंडेंवर जास्त पैजा

आष्टी विधानसभा मतदार संघासह परळी आणि केज मतदार संघात पंकजाताई मुंडे यांच्या विजयावरच जास्त पैजा लावण्यात आल्याची माहिती आहे. तसेच माजलगाव मतदार संघात धारुर आणि वडवणी या तालुक्यात मोठ्या प्रमाणात मुंडे यांच्या विजयावरच पैजा लावल्या आहेत.

बीड, गेवराई, माजलगाव तालुक्यात बजरंग सोनवणेंना पसंती

बीड लोकसभेला कोण विजय होणार याविषयी सर्वांचीच उत्सुकता शिगेला पोहचली आहे. बीड, गेवराई आणि माजलगाव तालुक्यात बजरंग सोनवणे यांच्या विजयावरच जास्त पैजा लावल्या आहेत. त्यामुळे कोण निवडून येते, याकडेच सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज्याचा बारावीचा निकाल ९३.३७ टक्के

यंदाही मुलींनीच मारली बाजी, कोकण विभागाचा सर्वाधिक तर मुंबई विभागाचा सर्वात कमी निकाल

मुंबई । प्रतिनिधी

मंगळवारी महाराष्ट्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने (राज्य मंडळ) बारावीचा निकाल जाहीर केला. यावेळी ९३.३७ टक्के निकाल लागला असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत तो २ टक्के अधिक आहे. कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक ९७.५१ टक्के तर मुंबई विभागाचा सर्वात कमी ९१.९५ टक्के लागला आहे. गतवेळेप्रमाणे परीक्षेच्या निकालातही मुलींनी बाजी मारली. मुलींचा निकाल ९५.४९ टक्के, तर मुलांचा ९२.६० टक्के लागला. छत्रपती संभाजी नगर येथील तनिषा सागर बोरणीकर या विद्यार्थिनीला १०० टक्के गुण मिळाले आहेत.

राज्य मंडळाच्या www.mahresult.nic.in या अधिकृत संकेतस्थळावर मंगळवारी दुपारी एक वाजता निकाल जाहीर करण्यात आला. यंदा १२ वीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते २३ मार्च दरम्यान झाली होती.

◀◀ पान २ वर

विभागात बीड अव्वल

छत्रपती सभाजी नगर ९४.७१, बीड ९५.७०, परभणी ९०.४२, जालना ९४.७१, हिंगोली ९१.८८ असा विभागाचा ९४.०८ टक्के निकाल लागला असून यात बीड जिल्हा अव्वल आहे.

किर्गिजस्तानात हिंसाचार : संभाजीनगर, धाराशिव, बीडचे ५०० विद्यार्थी अडकले!

विद्यार्थ्यांवर स्थानिक विद्यार्थ्यांकडून हल्ले, पाकिस्तानच्या चार विद्यार्थ्यांची हत्या

नवी दिल्ली। वृतसंस्था

किर्गिजस्तानात सध्या भारत आणि पाकिस्तानी विद्यार्थ्यांवर स्थानिक विद्यार्थ्यांकडून हल्ले केले जात आहेत. यामध्ये आत्तापर्यंत ४ पाकिस्तानी विद्यार्थ्यांची हत्या करण्यात आली. दरम्यान, वैद्यकीय शिक्षणानिमित्त या देशात महाराष्ट्रातील मराठवाडा अन् पश्चिम महाराष्ट्रातील ५०० हून अधिक विद्यार्थी अडकून पडले आहेत. त्यामुळे त्यांच्या सुरक्षेच्या कारणास्तव सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा ऑनलाईन घेण्याचा निर्णय स्थानिक प्रशासनाने घेतला आहे.

किर्गिजस्तानमध्ये सध्या सुरु असलेल्या हिंसाचाराचा महाराष्ट्रातल्या विद्यार्थ्यांना फटका बसला आहे. यामध्ये मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील ५०० हून अधिक

◀◀ पान २ वर

आंबाजोगाईला पंधरा दिवसाला पाणी देवभक्तांच्या पाणी प्रश्नाकडेही दुर्लक्ष!

अंबाजोगाई । प्रतिनिधी

धनेगावच्या मांजरा धरणात पाणी साठा असताना देखील अंबाजोगाईकरांना पंधरा दिवसाला पाणी पुरवठा केला जातो. नागरिकच पाणी टंचाईला सामोरे जात असताना मंदिरातील भक्तांच्या पाण्याचा प्रश्न तर दुरच आहे. तसेच आद्यकवी मुकुंदराज परिसरातील वनखात्याच्या जंगलात वन्य प्राणी मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे त्यांच्यासाठी बनविलेले पाणवठे कोरडे ठाक पडले आहेत.

कोकणास्थ ब्राह्मांची कुलदेवता असलेली माता योगेश्वरी देवी व मराठीचे आद्यकवी मुकुंदराज स्वामी समाधी परिसरात तेथील बोरच्या आधारे भाविकांना पाण्याची सोय झालेली आहे. परंतु शहरातील खोलेश्वर मंदिर बारा खांबी परिसरातील सकलेश्वर मंदिर, आमृतेश्वर मंदिर सर्वज्ञ पासोडीकार संत दासोपंत व काशीचे उपस्थान असलेल्या काशी विश्वनाथ मंदिर या परिसरामध्ये देवल कमिटीसह

◀◀ पान २ वर

पाणवठे पडले कोरडे

मुकुंदराज परिसरातील वनखात्याच्या जागेत वनविभागाने पशु प्राण्यासाठी पाणवठे तयार केलेले असून वनविभागाने फेब्रुवारी–मार्च मध्ये या पाणवठ्यात टँकरद्वारे पाणी पुरवठा केला मात्र आता एप्रिल–मे महिन्यामध्ये पाण्याची तिव्र टंचाई जाणवत असल्याने हे पाणवठे कोरडे पडले आहेत. त्यामुळे वन्य प्राण्यांना पाण्यासाठी वनवन भटकंती करावी लागत आहे.

योगेश्वरी मंदिरात आरओचे पाणी

नवरात्र व मार्गशिर्ष महिन्यात योगेश्वरी देवी मंदिरात मोठा उत्सव भरविला जातो. या उत्सवात दररोज लाखो भाविक या दर्शनाचा लाभ घेतात. देवल कमिटीच्या वतीने मंदिरातील भाविकांसाठी देवल कमिटीद्वारे घेतलेल्या बोअरचे पाणी आरओद्वारे शुद्ध करून भाविकांना पिण्यासाठी देण्यात येते. मंदिर परिसरात नगर पालिकेचीही पाईप लाईन असली तरी सध्या शहरातील पाणी पुरवठा विस्कळीत झाल्यामुळे मंदिराच्या बोअरद्वारेच भाविकांची तहान भागविली जाते.

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२१ मे २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू : १७.०० क्विंटल			
	१,८००	२,७००	२,३६३
ज्वारी/हायब्रिड : ११५.५० क्विंटल			
	१,६५०	३,२४०	२,४०८
मूग : ०.५० क्विंटल			
	९,८५०	९,८५०	९,८५०
तूर : २४.५० क्विंटल			
	८,९०१	१२,१८०	११,४५१
उडीद : २.५० क्विंटल			
	७,४००	७,४००	७,४००
बाजरी: ७६.५० क्विंटल			
	२,०००	२,८९४	२,५२०
चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल			
	१,७००	६,३००	४,०००
सोयाबीन: १४८.५० क्विंटल			
	४,५४०	४,५५०	४,४५०
हरभरा: १.०० क्विंटल			
	४,५००	६,०९९	५,२९९

ऐन दुष्काळात वाण प्रकल्पामुळे परळीकरांची तहान भागली!

» मुबलक पाणीसाठा मात्र काटकसरीने वापर करणे गरजेचे

परळी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात दुष्काळाची दाहकता दिवसेंदिवस वाढत असून परळी तालुक्यातील ग्रामीण भागात देखील टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरू करण्यात आला आहे. परळीची उप बाजार पेठ आणि तालुक्यातील सर्वात मोठी ग्राम पंचायत असलेल्या सिरसाळा येथे देखील टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत असून ह्या दुष्काळी परिस्थितीत वाण मध्यम प्रकल्प परळीकरासाठी वरदान ठरले आहे. उन्हाळ्याच्या उत्तरार्धात या मध्यम प्रकल्पात साठवण क्षमतेच्या ५० टक्के पेक्षा अधिक पाणी उपलब्ध असून चांगला पाऊस होई पर्यंत नागरिकांनी पाणी काटकसरीने वापर करणे गरजेचे बनले आहे.

परळी शहर व तालुक्यातील पंधरा गावासाठी नागापूर येथे वाण नदीच्या पात्रात धरण बांधण्यात आलेले आहे. २०२२ च्या पावसाळ्यात हे वाण मध्यम प्रकल्प ओसंडून वाहू लागले मात्र गत वर्षी कमी झालेल्या पावसाने हे प्रकल्प पूर्ण भरले गेले नाही. परतीच्या पावसाने जेमतेम ७० टक्के पाणी साठा प्रकल्पात उपलब्ध झाला. या वर्षी बीड जिल्ह्यात भयावह दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. जिल्ह्यातील अनेक लहान मोठे प्रकल्प कोरडेठाक पडले होते.

परळी तालुक्यातील बोरणा, बोधेगाव या मध्यम साठवण प्रकल्पासह चांदापुर, कन्हेरवाडी, गुट्टेवाडी, खोडवा सावरगाव, कातकरवाडी,

◀◀ पान २ वर

६ वर्षाखाली वाढली साठवण क्षमता

परळी शहर व तालुक्यासाठी वरदान ठरलेल्या वाण प्रकल्पाची साठवण क्षमता ६ वर्षाखाली वाढली आहे. २०१७–१८ मध्ये भीषण दुष्काळात हा प्रकल्प कोरडा पडला होता.यावेळी परिसरात असलेल्या हजारो शेतकऱ्यांनी वाण धरणातील गाळ उपसा करून शेतात नेऊन टाकला होता. यामुळे प्रकल्पात असलेला गाळ कमी होऊन पाणी साठवण क्षमता वाढली आहे.

नगर परिषदेचे ढिसाळ नियोजन

नागापूर येथील वाण प्रकल्पातील शुद्धीकरण केंद्रातील पाणी परळी शहरातील वडसवित्री नगर भागातील टेकडीवर असलेल्या एम.डी.आर ह्या टाकीत जमा करण्यात येते. येथून पुढे हे पाणी शहरात असलेल्या नगर परिषद, भीम नगर, मोंढा मार्केट, मलीकपूर व शिवाजी नगर भागात असलेल्या जल कुंभात वितरित करून शहराला पाणी पुरवठा करण्यात येतो. नागापूर ते परळी दरम्यान ३ ते ४ ठिकाणी मुख्य जलवाहिनी मोठी गळती असून नगर परिषदेमार्फत ती दुरुस्त करणे आवश्यक आहेत. केवळ नगर परिषदेच्या ढिसाळ कारभाराचे पाणी उपलब्ध असून देखील परळीकराना ५ ते ६ दिवसाआड पाणी मिळत आहे.

वाण मध्यम प्रकल्पाची सद्यस्थिती

एकूण पाणी साठा –१९.७२ द.ल.घ.मी.
मृत साठा –०.३८ द.ल.घ.मी.
उपयुक्त साठा – १९.३४ द.ल.घ.मी.
आज स्थितीत पाणीसाठा –१०.३८ द.ल.घ.मी.
एकूण पाणी ५३ .०० टक्के उपलब्ध

अग्रलेख

मनसोक्त बरसावा हीच अपेक्षा...

गतवर्षी पावसाने ओढ दिल्याने राज्याच्या बहुतांश भागात पाण्याची टंचाई जाणवत आहे त्यामुळे यंदाच्या मान्सूनच्या वाटचालीकडे प्रत्येकाचे डोळे लागले आहेत. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने मान्सूनच्या आगमनाची दिलासा देणारी बातमी दिली. दक्षिण बंगालचा उपसागर, निकोबार बेटे आणि दक्षिण अंदमान समुद्रात मान्सूनने पुढे वाटचाल सुरू केली आहे.

अंदमानमधून नैऋत्य मोसमी वाऱ्यांना केरळपर्यंत पोहोचण्यासाठी १० दिवस लागतात. मान्सूनची वाटचाल अशीच राहिली तर तो ३१ मेपर्यंत केरळमध्ये दाखल होईल. मान्सूनपूर्व पाऊस केरळ, तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल या भागात होतो म्हणून तेथे रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. भारताच्या कृषिप्रधान अर्थव्यवस्थेसाठी अतिशय महत्त्वाचा असलेल्या मान्सूनचे रविवारी निकोबार बेटावर थाटात आगमन झाले. त्याने देशाचा दुर्गम दक्षिण भागही व्यापला आहे. आता तो मालदीव, कोमोरिन आणि बंगालच्या उपसागरातील काही भाग उर्वरित निकोबार बेटे आणि दक्षिण अंदमान समुद्राकडे वेगाने वाटचाल करीत आहे, असे भारतीय हवामान विभागाने म्हटले आहे. साधारणपणे २२ मेपर्यंत मान्सून अंदमानात दाखल होत असतो मात्र, यंदा त्याने तीन दिवस आधीच या भागात धडक मारली आहे. २४ मेपर्यंत मान्सून संपूर्ण बंगालचा उपसागर व्यापेल.

गत काही दिवसांपासून उष्णतेच्या प्रखर लाटांनी संपूर्ण देश होरपळून निघाला आहे. दिल्लीतील नजफगड येथे ४७ अंश इतक्या विक्रमी तापमानाची नोंद झाली होती. गत ८० वर्षातील हे विक्रमी तापमान होते. हवामान विभागाने या पूर्वीच देशात मान्सूनचे वेळेपूर्वीच आगमन होईल तसेच 'ला निना' हा घटक सक्रीय होणार असल्याने सरासरीपेक्षा जास्त पाऊस होईल, असा अंदाज वर्तवला आहे.

मान्सूनचा आतापर्यंतचा प्रवास लहरीपणाचा असल्याचेच दिसून येते. गत १५० वर्षापासून मान्सूनचा लहरीपणा वारंवार दिसून आला आहे. कधी तो फार आधी तर कधी अतिशय उशिरा केरळमध्ये दाखल झाला आहे. यंदा मान्सून ९ ते १६ जून दरम्यान महाराष्ट्रात, २५ जून रोजी राजस्थान आणि ६ जुलैपर्यंत मध्य प्रदेशात पोहोचण्याची शक्यता आहे. राज्यात पूर्वमोसमी पाऊस सुरू असून बऱ्याच ठिकाणी ढगांचा गडगडाट, गारा, वादळी वाऱ्यासह पाऊस पडत आहे. २३ मेपर्यंत कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यात यलो अलर्टचा इशारा देण्यात आला आहे. राज्याच्या काही भागात उन्हाचा चटका वाढला आहे. 'ला निना' या वातावरणीय परिस्थितीमुळे मोसमी वाऱ्यांनी जोरदार आगेकूच ठेवली आहे. ३१ मेपर्यंत देशाच्या मुख्य भूमीवर पाऊस पोहोचेल, असा अंदाज आहे. पाऊस लवकर आणि चांगला झाला तर शेती बहरते. केरळमधून साधारणत: आठवडाभराने सिंधुदुर्ग जिल्ह्यातून मोसमी पाऊस राज्यात प्रवेश करतो. 'ला निना'च्या प्रभावामुळे यंदा चांगला पाऊस होण्याचा अंदाज आहे. यंदा सरासरीपेक्षा अधिक पाऊस होण्याची शक्यता असून तो ऑगस्ट-सप्टेंबरपर्यंत टिकेल, असा अंदाज आहे. 'एल निनो' आणि 'ला निना' या हवामानाच्या दोन परिस्थितींचा परिणाम पावसावर होतो. गतवर्षी 'एल निनो' सक्रिय होता त्यामुळे सरासरीहून कमी म्हणजे ९४ टक्केच पाऊस झाला होता. यंदा त्याचा प्रभाव कमी झाला आहे त्यामुळे येत्या ३ ते ५ आठवड्यात 'ला निना'ची स्थिती निर्माण होणे शक्य आहे. यंदा मान्सून वाऱ्यांची अनुकूलता, त्याचा वेग या बाबी खूप सकारात्मक आहे. उत्तर प्रदेशात १८ ते २५ जूनपर्यंत तर बिहार-झारखंडमध्ये १८ जूनपर्यंत मान्सून पोहोचेल असा अंदाज आहे. देशात मे महिन्यातील कडक उन्हामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. तापमान प्रचंड वाढले आहे. उत्तर भारतात तापमान ४७ अंशांपर्यंत पोहोचले आहे. महाराष्ट्रात मान्सून दाखल होण्यास गतवर्षी उशीर झाला होता. यंदा तो ११ जूनपर्यंत दाखल होईल असा अंदाज आहे. कृषी क्षेत्रासाठी मान्सून महत्त्वाचा आहे. देशाचे अर्थकारणच त्यावर अवलंबून आहे त्यामुळे अपेक्षिल्यानुसार तो मनसोक्त बरसावा हीच अपेक्षा.

शहर व परिसरात विजेचा लपंडाव, अघोषित लोडशेडिंग, नागरिक हैराण

माजलगाव । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून शहर व परिसरात विज वितरण कंपनीच्या वतीने सातत्याने दिवसभरात अघोषित लोडशेडिंग होत असून भर उन्हाळ्यात नागरिक घामाने लाहीलाही होत आहेत. यामुळे नागरीकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.शहर व परिसरातील विज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी नागरीकांनी केली आहे.

माजलगाव शहरात विज वितरण कंपनीच्या वतीने विजपुरवठा केला जातो. येथील विज वितरण कंपनी सातत्याने चर्चेचा विषय असून कारभाराचा भोंगळपणा अनेकवेळा उघडकीस आला आहे.शहरात गेल्या काही दिवसांपासून सातत्याने विज गूल होत आहे. विज वितरणाची समस्या निर्माण झाली असेल तर एक दोन दिवसात दुरुस्त करता येते. मग सतत पंधरा दिवसांपासून दिवसभरात दर तासाला विज गायब होत आहे. याकडे दुर्लक्ष कशामुळे होत आहे. का शहरात अघोषित लोडशेडिंग सुरु करण्यात आली आहे. अशी चर्चा शहरातील नागरीकांमध्ये सुरु आहे. दरम्यान येथील विजवितरण कंपनीचे कार्यालय सतत चर्चेत असते. कारण अघोषित लोडशेडिंग [illegible] बील आल्याने [illegible] ग्राहकांच्या स्थानिक [illegible] यासंदर्भात अनेक तक्रारी आहेत. मात्र सहा, सहा महिने झाले तरी या तक्रारीचे निर्सन केले जात नाही. ग्राहक विज वितरण कंपनीच्या कार्यालयात चकरा मारुन बेजार होत आहेत. मात्र अधिकारी, कर्मचारी काही भेटत नाहीत. भेटले तर प्रोसिजर सुरू आहे. वेळ लागेल अशी उत्तरे दिली जातात. यामुळे ग्राहकांना नाहक त्रास सहन करावा लागतो आहे. कोणत्याही तक्रारीचे निरसन एखाद्या महिन्यात होणे अपेक्षित आहे. कारण ग्राहकांचा जेवढा जास्त वेळ जाईल तेवढे या विज वितरण कंपनी व्याज लावत असते. यामुळे अगोदरच जास्तीचे बील आणि वेळ गेल्याने व्याजाचा भूरदंड ग्राहकांना बसत आहे. याला जबाबदार कोण ? असाही प्रश्न निर्माण झाला आहे.म्हणून येथील स्थानिक कार्यालयाच्या कारभाराकडे वरिष्ठांनी लक्ष घालण्याची मागणी ग्राहकांनी केली आहे. पावसाळा असो अथवा नसो तसेच रात्री - बेरात्री कधीही विज गायब होत आहे.

लैंगिक छळप्रकरणी ब्रिजभूषण यांच्या विरोधात न्यायालयाकडून आरोप निश्चित

नवी दिल्ली । वृतसंस्था

महिला कुस्तीपटूंच्या लैंगिक छळप्रकरणी भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष व भाजपचे खासदार ब्रिजभूषण शरण सिंह यांच्याविरोधात न्यायालयाने मंगळवारी आरोप निश्चित केले आहेत. दिल्लीतील राऊस एव्हेन्यू न्यायालयाने ब्रिजभूषण सिंग यांच्याविरुद्ध महिला कुस्तीपटूंचा लैंगिक छळ आणि विनयभंगासह त्यांना धमकावण्याचे गंभीर आरोप निश्चित केले आहेत. यासंदर्भात महिला कुस्तीपटूंनी फौजदारी खटला दाखल केला आहे.

ब्रिजभूषण शरण सिंह यांच्यावरील आरोपांबाबत न्यायालयाने त्यांना गुन्ह्याची कबुली देण्याविषयी विचारणा केली. मात्र, आपल्यावरील आरोप खोटे असल्याने ते स्वीकारण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याचे ब्रिजभूषण शरण सिंह यांनी न्यायालयाला सांगितले. या प्रकरणात सहआरोपी विनोद तोमर यांच्याविरुद्धही न्यायालयाने आरोप निश्चित केले. दरम्यान, महिला कुस्तीपटूंच्या लैंगिक छळप्रकरणात अडकलेले ब्रिजभूषण शरण सिंह यांचे तिकीट कापून भाजपने कैसरगंज मतदारसंघात त्यांचे पुत्र करण भूषण सिंह यांना उमेदवारी दिली आहे.

परळी तालुक्यात उष्माघाताचा पहिला बळी

आठवडी बाजारात शेतकऱ्यांच्या मृत्यू

परळी । प्रतिनिधी

उन्हाची तीव्रता प्रचंड वाढली असुन उन्हाच्या तीव्रतेने जीवाची लाही लाही होत आहे. वाढलेले तापमान लक्षात घेता उष्माघातापासून बचाव करण्यासाठी जागृती करण्यात येत आहे. मात्र हातावर पोट असणाऱ्या लोकांना उन्हात काम केल्याशिवाय गत्यंतरच नाही. यातच सोमवार रोजी परळीच्या आठवडी बाजारातील एका भाजी विक्रेत्यावर काळाने घाला घातला असून परळीत उष्माघाताने हा बळी गेला आहे.

परळी तालुक्यातील दैठणा घाट येथील महादेव संभाजी गुट्टे (वय ५४ वर्ष) हे अल्पभूधारक शेतकरी आपल्या शेतात भाजीपाला उत्पादित करून आठवडी बाजारात हातावर भाजीपाला विकतात. सोमवार दि २० रोजी परळी शहरातील आठवडी बाजारात नेहमीप्रमाणे भाजी विक्रीसाठी गुट्टे हे बसले होते. सकाळपासूनच उन्हाचा कडाका होता. परळीत दुपारच्यावेळी तापमानाचा पारा ४३ अंश सेल्सिअस इतका वाढलेला होता. उन्हाची प्रचंड तीव्रता वाढलेली असल्याने भर दुपारी उष्माघाताचा फटका या भाजी विक्रेत्याला बसला आणि भर बाजारातच उष्माघाताने भोवळ येऊन ते कोसळून पडले. आजूबाजूच्या लोकांनी उपचारासाठी तात्काळ उपजिल्हा रुग्णालय परळी येथे आणले. मात्र दवाखान्यात पोहोचण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. महादेव संभाजी गुट्टे यांच्या आकस्मिक मृत्यूमुळे संपूर्ण कुटुंब उघड्यावर पडले असुन पत्नी, दोन मुले, दोन मुली अशा परिवाराची उदरनिर्वाहाची संपूर्ण जबाबदारीच महादेव गुट्टे यांच्यावर होती. मात्र घरातील कर्ताधर्ता माणूसच गेल्याने हे कुटुंब उघड्यावर पडले आहे.

किर्गिस्थान येथील वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सुखरूप घरी पोहोचवावे-आ.धस

आष्टी । प्रतिनिधी

किर्गिस्थान येथील हिंसाचारामध्ये परदेशातील विद्यार्थ्यांना लक्ष करण्यात आले असून त्यांचेवर अत्याचार सुरू आहेत तेथील महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांना सुखरूप आपापल्या गावी पोहोचवावे यासाठी महाराष्ट्र शासनाने तात्काळ कार्यवाही करावी अशी विनंती आ. सुरेश धस यांनी एका विशेष पत्राद्वारे केली आहे.

किर्गिस्थान येथे भारतातील अनेक विद्यार्थी आणि विद्यार्थिनी वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी गेलेले आहेत मात्र गेल्या काही दिवसापासून स्थानिक नागरिक आणि बाहेरील देशातील शिक्षण घेणारे विद्यार्थी यांचे मध्ये हिंसाचार उफाळला असून त्यामध्ये बाहेरच्या देशातील विद्यार्थ्यांना त्यांच्या वस्तीगृहामध्ये घुसून मारहाण करत त्यांचेवर अत्याचार सुरू आहेत भारत देशातील या विद्यार्थ्यांमध्ये बीड जिल्ह्यातील शिवतेज केशव राजेनिंबाळकर आणि धनश्री केशव राजेनिंबाळकर या भावंडांचा समावेश असून त्यांनी बीड जिल्ह्यातील आणखी दहा विद्यार्थी आणि धाराशिव आणि संभाजीनगर येथील काही विद्यार्थी आहेत तर मराठवाड्यातील अनेक विद्यार्थी असल्याची अशी माहिती दिली आहे त्यानुसार त्यांच्या पालकांनी आमदार सुरेश धस यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी तात्काळ महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस आणि अजित दादा पवार यांच्याशी संपर्क साधून या सर्व विद्यार्थ्यांना सुखरूप घरी परत आणण्यासाठी आवश्यक ती कारवाई तात्काळ करावी अशी विनंती विशेष पत्राद्वारे केली आहे बीड जिल्हाधिकारी श्रीमती दीपा मुधोळ मुंडे यांना देखील याप्रकरणी तात्काळ कार्यवाही करावी याबाबत पत्रव्यवहार केला आहे.

धानोरा महाविद्यालयाची यशाची परंपरा कायम

विज्ञान ९८.४%, कला ९४.४४ %, वाणिज्य ९१.६६% निकाल

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ संभाजीनगर यांनी नुकताच बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल मंगळवार दि. २१ मे २०२४ रोजी ऑनलाईन जाहीर केला आहे. आष्टी तालुक्यातील धानोरा येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी संचलित कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय धानोरा या महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा - ९८.४%, कला शाखेचा - ९४.४४% व वाणिज्य शाखेचा- ९१.६६% निकाल लागला असून याहीवर्षी धानोरा महाविद्यालयाने आपली यशाची परंपरा कायम राखली आहे. विशेष म्हणजे या महाविद्यालयातील १२५ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांचे तालुक्यातून अभिनंदन होत आहे. विज्ञान शाखेतून शेख नुमान ९०% (प्रथम), खिळदकर साक्षी ९०% (प्रथम), विधाते ऋतुजा ८९.१७% (द्वितीय), शहाणे वैष्णवी ८८.३३% (तृतीय). कला शाखेतून- माने रामेश्वरी ८६.५०% (प्रथम) सरोदे बेबी ८४.८३% (द्वितीय) बेरड वृती ८३.५०% (तृतीय) तर वाणिज्य शाखेतून- बहोत निकिता ८५.५०% (प्रथम) बाफना हर्ष ८४.८३% (द्वितीय) पार्थे ऋतुजा ८४.८३% (द्वितीय) भोर सुनील ८३.५०% (तृतीय) क्रमांक घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. या कनिष्ठ महाविद्यालयातून ३१६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. एकूण महाविद्यालयाचा ९७.१५% निकाल लागला असून याहीवर्षी महाविद्यालयाने आपली यशाची परंपरा कायम राखली आहे. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक माजी आमदार भीमरावजी धोंडे, प्राचार्य डॉ.वाघुले, उपप्राचार्य डॉ कैलास वायभासे, प्राध्यापक निसार शेख, प्राध्यापक राजू शेलार, प्राध्यापक विवेक महाजन, प्राध्यापक अजिनाथ गिलचे, प्राध्यापक गहिनीनाथ एकशिंगे, प्राध्यापक आतेश बनसोडे, प्राध्यापक राजेंद्र मिसाळ, प्राध्यापक सतीश तागड, प्राध्यापिका शबाना शेख, प्राध्यापिका रत्नामाला तरटे, प्राध्यापक सुभाष मोरे, प्राध्यापक गोरख वाळके, प्राध्यापक ज्ञानेश्वर अमृत, प्राध्यापक डॉ उस्मान पठाण, प्राध्यापक डॉ सुभाष नागरगोजे, प्राध्यापिका अंजना गिरी, प्राध्यापक डॉक्टर संजय झांजे आदींनी अभिनंदन केले आहे.

बोर्ड परीक्षेत रयतच्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम

बारावी कला शाखेचा १००% तर विज्ञान शाखेचा ९८.७१% निकाल

अंमळनेर । प्रतिनिधी

अंमळनेर (भां) येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री गणेश विद्या मंदिर व कै.प्रशांत तुकाराम पोकळे कनिष्ठ महाविद्यालयाने याहीवर्षी एच.एस.सी. परीक्षेतील उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली असून महाविद्यालयाच्या कला शाखेचा निकाल १००% लागला असून विज्ञान शाखेचा निकाल ९८.७१% लागलेला आहे.

फेब्रुवारी/मार्च-२०२३ मध्ये झालेल्या बोर्ड परीक्षेमध्ये कै.प्रशांत तुकाराम पोकळे कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा निकाल ९८.७१% लागला असून सूरज सुग्रीव पोकळे हा विद्यार्थी ८९.३३% गुण मिळवून विज्ञान शाखेतून प्रथम, कु.वैष्णवी सोमनाथ पोकळे ८६% गुण मिळवून द्वितीय तर कु.नेहा अनिल पोकळे ८२.८३% गुण मिळवून तृतीय आली आहे.कला शाखेचा निकाल १००% लागला असून कला शाखेतून कु.अनुराधा रावसाहेब बेदरे ही विद्यार्थिनी ७५% गुण मिळवून कला शाखेतून प्रथम,कु नम्रता नागेश पखाले ७४.१७% गुण मिळवून द्वितीय तर कु.मोहिनी वसंत सव्वासे हीने ७४% गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे. महाविद्यालयाच्या या नेत्रदीपक यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे जनरल बाडी सदस्य तथा स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन ए.टी.पोकळे,स्थानिक स्कूल कमिटी सदस्य भास्करराव पोकळे, मुरलीधरआप्पा पवार,शाळेचे मुख्याध्यापक प्राचार्य बी.व्ही.वरडूळे, पर्यवेक्षक आर.एम.हाके, सर्व स्कूल कमिटी सदस्य ,शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, शाळा व्यवस्थापन व विकास समिती सदस्य तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारीवृंद यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

गजानन कनिष्ठ महाविद्यालयाचा १२ वी चा शेकडा निकाल ९७.९४ टक्के

नवगण राजुरी। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात आलेल्या १२ वीच्या परिक्षेचा निकाल जाहीर झाला असून नवगण राजुरी येथील गजानन कनिष्ठ महाविद्यालयाचा शेकडा निकाल ९७.९४ टक्के एवढा लागला असून या महाविद्यालयाने उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.

गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नवगण राजुरी ता.जि.बीड येथील विज्ञान शाखेचा निकाल ९९.९२ टक्के, वाणिज्य शाखेचा शेकडा निकाल ९६.१५ टक्के तर कला शाखेचा शेकडा निकाल ९४.११ टक्के, व्यवसाय अभ्यासक्रम ८९.४७ टक्के इतका लागला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, कार्यवाहक एम.ए. राऊत, गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे, उपमुख्यध्यापक शिंदे एस.एस., पर्यवेक्षक शेख एस.वाय., सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

भागुजीराव ढेकळे कनिष्ठ महाविद्यालयाचा १२ वी चा शेकडा निकाल ९८.६१ टक्के

गेवराई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात आलेल्या १२ वीच्या परिक्षेचा निकाल जाहीर झाला असून पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागुजीराव ढेकळे कनिष्ठ महाविद्यालयाचा शेकडा निकाल ९८.६१ टक्के ऐवढा लागला असून या महाविद्यालयाने निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे.

कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडळसिंगी ता.गेवराई, जि.बीड येथील विज्ञान व वाणिज्य शाखेचा शेकडा निकाल १०० टक्के तर कला शाखेचा शेकडा निकाल ७५.७८ टक्के इतका लागला असून विज्ञान शाखेतून गुणानुक्रमे प्रथम वाघमारे अभिजीत भारत ९१.५० टक्के, द्वितीय चौधरी सृष्टी परमेश्वर ८९.३३, तृतीय गव्हाणे सचिन बाळू ८९.१७ टक्के, वाणिज्य शाखेतून प्रथम होळकर करण महादेव ८३.८३ टक्के, द्वितीय कु.पौळ किर्ती पांडूरंग ७८.१७ टक्के, तृतीय जायगुडे सुरज श्रीधर ७८.०० टक्के, कला शाखेतून प्रथम कु.सय्यद सानिया जावेद ८०.१७ टक्के, द्वितीय कु.पवळ कार्तिका शिवाजी ७९.३३, तृतीय शिंदे सारिका बळीराम ७८.५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, कार्यवाहक एम.ए. राऊत, कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य आण्णासाहेब थिटे, पर्यवेक्षक रावसाहेब भोसले, राजेंद्र सोनवणे, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

पान १वरून...

शेतकऱ्यांची खरिपासाठी

महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात सोयाबीनचे उत्पादन घेतले जाते. विशेषत: मराठवाडा आणि विदर्भात कापसानंतर सोयाबीनचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात असेत. मात्र, ज्यावेळी माल शेतकऱ्यांच्या हातात येतो, त्यावेळी दरात मोठी घसरण होते. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसतो. कधी कधी शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च देखील निघत नाही. कधी शेतकऱ्यांच्या पिकाला अवकाळीचा फटका बसतो तर कधी दुष्काळाचा फटका बसतो. आस्मानी संकटातून बाहेर पडलेल्या शेतकऱ्यांना सुलतानी संकट गाठते, अशी शेतकऱ्यांची स्थिती होत आहे. दुसरीकडे शासन शेती मालाला योग्य भाव देत नाही शिवाय नुकसानीची भरपाई सुद्धा वेळेवर दिली जात नाही.

राहुल गांधींची

त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहिली. अखिल भारतीय युवक काँग्रेसच्या कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करून राजीव गांधी यांना आदरांजली वाहण्यात आली. युवक काँग्रेसचे अध्यक्ष श्रीनिवास बी. व्ही. यांनी आयोजित केलेल्या या शिबिरामध्ये मोठ्या प्रमाणात युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी रक्तदान केले.

राहुल गांधींची भावूक पोस्ट

राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आपल्या वडिलांविषयी सोशल मीडियावरील एक्सवर अत्यंत भावनिक पोस्ट शेअर केली आहे. ''बाबा, तुमचे स्वप्न हेच माझे स्वप्न आहे. तुमच्या आकांक्षा माझ्या जबाबदाऱ्या आहेत. तुमच्या आठवणी नेहमीच आमच्या हृदयात ताज्या आहेत आणि असतील,'' अशा शब्दांत राहुल गांधी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. यासोबतच राहुल गांधी यांनी वडिलांसोबतचा त्यांच्या बालपणीचा एक फोटो देखील या पोस्टमध्ये जोडला आहे.

आंबाजोगाईला पंधरा दिवसाला पाणी

पालिकेच्या वतीने भाविकांसाठी पिण्याच्या पाण्यांची सोय केलेली नाही. त्यामुळे भाविकांमध्ये कुचंबना होत असताना दिसत आहेत. एकीकडे मांजरा धरणातून लातूर-बीड- उस्मनाबाद या जिल्ह्याची तहान भागविणारे धरण सध्या मृत साठ्यात असले तरी या धरणातून लातूर शहराला चार दिवसाला पाणी पुरवठा होतो. तर अंबाजोगाई शहराला त्याच धरणातून येणार्या पाणी पंधरा दिवसाला नागरिकांना पुरवठा केला जातो. शहर वासीयांनाच पिण्याच्या पाण्यासाठी धडपड करावी लागत असली तरी मंदिरातील भाविकांचा कोण विचार करेल असाच प्रश्न उपस्थित होवू लागला आहे.

किर्गिजस्तानात हिंसाचार : संभाजीनगर,

विद्यार्थी किर्गिजस्तानमध्ये अडकले आहेत, पण ते सर्वजण सुरक्षित असल्याची माहिती मिळते आहे. वैद्यकीय शिक्षणासाठी ५०० पेक्षा जास्त विद्यार्थी सध्या महाराष्ट्रातून किर्गिजस्तानमध्ये वास्तव्यास आहेत. यामध्ये संभाजीनगर, धाराशिव आणि बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांच्या सध्या परीक्षा सुरु आहेत, त्यातच हिंसाचाराच्या घटना सुरु झाल्याने स्थानिक प्रशासनाने भारतीय आणि पाकिस्तानी विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाईन घेण्यास परवानगी दिली आहे. दरम्यान, परीक्षेनंतर जुनमध्ये सर्व विद्यार्थी भारतात परतण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. किर्गिजस्तानमधील पाकिस्तानी युवक आणि स्थानिक युवकांमध्ये वाद झाल्याने हिंसाचार भडकल्याचे सांगितले जात आहे. हा वाद इतका विकोपाला गेला आहे की, यामध्ये आत्तापर्यंत ४ पाकिस्तानी विद्यार्थ्यांची हत्या करण्यात आली आहे.

राज्याचा बारावीचा निकाल

परीक्षेसाठी १५ लाख १३ हजार ९०९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यापैकी १४ लाख २३ हजार ९७० विद्यार्थी परीक्षेला बसले होते, त्यापैकी १३ लाख २९ हजार ६८४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. राज्य मंडळाच्या मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या ९ विभागातील ३ हजार ३२० केंद्रांवर ही परीक्षा झाली. दरम्यान, शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी बारावीच्या परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून, नापास झालेल्यांनी निराश होण्याची गरज नाही. जुलै महिन्यात दुसरी परीक्षा घेतली जाईल आणि ऑगस्टमध्ये प्रवेश प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी निकाल जाहीर केला जाईल, असे ते म्हणाले.

संभाजीनगरच्या तनिषा बोरणीकरला १०० टक्के गुण

छत्रपती संभाजी नगर येथील तनिषा सागर बोरणीकर या विद्यार्थिनीला १०० टक्के गुण मिळाले आहेत. १०० टक्के गुण मिळवणारी ती महाराष्ट्रातील एकमेव विद्यार्थिनी आहे. विद्यार्थिनीला थेट परीक्षेत ५८२ आणि खेळात १८ गुण मिळाले, अशा प्रकारे तिला एकूण ६०० गुणांपैकी ६०० गुण मिळाले.

विभागनिहाय परीक्षेचा निकाल...

कोकण : ९७.५१ टक्के, नाशिक : ९४.७० टक्के, पुणे : ९४.४४ टक्के, कोल्हापूर : ९४.२४ टक्के, छत्रपती संभाजी नगर : ९४.०८ टक्के, अमरावती : ९३ टक्के, लातूर : ९२.३६ टक्के, नागपूर : ९२.१२ टक्के आणि मुंबई : ९१.९५ टक्के.

ऐन दुष्काळात वाण प्रकल्पामुळे

मोहा, मालेवाडी, गोपाळपूर, करेवाडी व दैठणा या लघु प्रकल्पाने तळ गाठला आहे. परळी शहर व तालुक्यातील अनेक गावांची तहान भागवण्याची मदार वाण मध्यम प्रकल्पावर असल्याने मोठा पाऊस होई पर्यंत प्रकल्पात उपलब्ध असलेले पाणी काटकसरीने वापर करणे महत्वाचे असणार आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार, दि. २२ मे २०२४ ३

पांगरी येथील नरसिंह सप्ताहात श्रीकृष्ण स्वयंवर सोहळा संपन्न

किल्ले धारूर । प्रतिनिधी

तालुक्यातील पांगरी येथे मागील सहा दिवसापासून नृसिंह जन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे.या सप्ताहात श्रीमद्? भागवत कथाव्यास ह भ प गणेशानंद महाराज जोगदंड शास्त्री यांची भागवत कथा संपन्न झाली असता या सप्ताहात सहाव्या दिवशी दुपारच्या वेळी श्रीकृष्ण स्वयंवर सोहळा थाटात संपन्न झाला.या स्वयंवर सोहळ्यास शेकडो संख्येने भाविक भक्त उपस्थित होते.

धारूर तालुक्यातील पांगरी येथे नृसिंहाचे जागृत देवस्थान आहे.शेकडो वर्ष जुन्या विस्तीर्ण पिंपळाच्या झाडाखाली श्री नृसिंहाचे मंदिर उभा करण्यात आलेले आहे.नृसिंह मंदिराच्या ठिकाणी मागील सहा दिवसापासून अखंड हरिनाम सुरू आहे. याचा अखंड हरिनाम सप्ताहात श्रीमद्? भागवत कथाव्यास ह भ प गणेशानंद महाराज जोगदंड शास्त्री यांची भागवत कथा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. मंगळवार रोजी इंद्रसिंह जन्माच्या निमित्त या कार्यक्रमाचा समारोप करत असताना श्रीकृष्ण रुक्मिणी स्वयंवर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या स्वयंवर कार्यक्रमास शेकडोच्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते.अतिशय थाटात हा श्रीकृष्ण रुक्मिणी स्वयंवर कार्यक्रम संपन्न झाला.

वारकरी संप्रदायामध्ये स्वामी ही पदवी फक्त बंकट स्वामी महाराज यांनाच आहे -ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे

बीड । प्रतिनिधी

वारकरी संप्रदाय हा खूप मोठा आहे.आणि या वारकरी पंथाचे मूळ हे बीड तालुक्यातील नेकनूर असून तेथील बंकट स्वामी महाराज हेच वारकरी संप्रदायात स्वामी म्हणून श्रेष्ठ आहेत. स्वामी या शब्दाचा अर्थ मालक किंवा धनी होतो ही पदवी वारकरी संप्रदायांमध्ये फक्त बंकट स्वामी महाराज यांनाच आहे असे भावोद्गार ह.भ.प मठाधिपती लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी काल कपिलधार वाडी येथे आयोजित त्री दिवशीय कीर्तन महोत्सवाच्या सांगता प्रसंगी घेतलेल्या काल्याच्या कीर्तनामध्ये बंकट स्वामी महाराज यांचा उल्लेख केला.

या काल्याच्या कीर्तनासाठी महाराजांनी जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांचा

।। देहुडा चरणी वाजवितो वेणू ।।
। । गोपिका रमणू स्वामी माझा.।।

या अभंगावर सविस्तर असे किर्तन सेवा संपन्न झाली आपल्या कीर्तनामध्ये महाराजांनी श्रीकृष्णाने गोकुळामध्ये केलेल्या खोड्या बाल गोपाळ बरोबर घेऊन संपूर्ण गोकुळात घातलेला धुमाकूळ तसेच विविध प्रकारचे खेळलेले खेळ आणि केलेला काही चमत्कार देखील उदाहरणे देऊन सांगितला.

या काल्याच्या कीर्तनामध्ये दहीहंडी या विषयावर देखील महाराजांनी सविस्तर भाष्य केले कीर्तनामध्ये मान्यवरांच्या हस्ते दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याचबरोबर स्वामी या शब्दावर बोलताना बंकट स्वामी महाराज नेकनूर कर हे वारकरी संप्रदायामध्ये एकमेव स्वामी ही पदवी घेऊन ओळखले जातात. आणि दुसरे स्वामी म्हणजे जवळच असलेले मनमथ स्वामी हे आपण सर्वजण नशीबवान आहोत की या दोन स्वामींच्या सानिध्यात आपल्याला जन्म मिळाला म्हणून खरोखरच आपण नशीबवान आहोत असेही महाराजांनी सांगितले आणि महाराजांनी आपल्या परिसराचे वैभव असलेले संत श्रेष्ठ श्री मन्मथ स्वामी महाराज कपिलधार व श्री.गुरु बंकट स्वामी महाराज हे दोन्ही संत आपल्या परिसराचे वैभवान पडलेली भर आहे. आणि या संतांच्या सहवासात त्यांच्या पंचक्रोशीत आपला जन्म झाला आहे हे आपले वैभव आहे.आणि काल्याच महत्त्व सांगून आपले कीर्तनाची सांगता केली.

या नाम सप्ताह मध्ये वाघेश्वरी मित्र मंडळ व कपिलधारवाडी मित्र मंडळ यांनी सर्व अतिथी पाहुण्यांचे स्वागत केले या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील,ज्योतीताई मेटे, डॉ.योगेश क्षीरसागर, संदीप नाना नवले (सरपंच) यांच्याबरोबरच गावातील सर्व गावकरी मंडळी भजनी मंडळ व परिसरातील भावीक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते सर्वांनी किर्तन श्रावणाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला.

मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे कपिलधारवाडीत स्वागत!

नारळी सप्ताह निमित्त मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे कपिलधार वाडीत स्वागत करण्यात आले. यावेळी मनोज जरांगे यांनी धार्मिक कार्यात आपण कोणतेही राजकीय विधान करणार नसल्याचे सांगत गावकर्यांनी केलेल्या सन्मानाबद्दल आभार व्यक्त केला.

दुष्काळ लवकर संपावा ईश्वरचरणी प्रार्थना करतो-डॉ.योगेश क्षीरसागर

बीड जिल्ह्यात सध्या दुष्काळ परिस्थिती आहे. पिण्याच्या पाण्यासह शेतकर्यांना मशागतीसाठी पावसाची अत्यंत आवश्यकता असून दुर्गम भागात दुष्काळी परिस्थिती असतानाही गावातील एकजुटीमुळे सप्ताहाचे योग्य नियोजन झाले आहे. कपिलधार वाढीच्या पावन भूमीत ईश्वरचरणी प्रार्थना करतो लवकरच दुष्काळ परिस्थिती संपावी व पावसाचे आगमन व्हावे शेतकर्यांना मशागतीसाठी पावसाची अत्यंत आवश्यकता असून ईश्वरचरणी प्रार्थना करतो दुष्काळ लवकर संपणार असल्याची प्रतिक्रिया युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सप्ताह निमित्त आले असता यावेळी दिली.

स्व.विनायक मेटे यांचे कार्य पुढे चालवणार-ज्योतीताई मेटे

डोंगराळ भागात निसर्ग रम्य अशा ठिकाणी वसलेले कपिलधार वाडी हे छोटेसे गाव अत्यंत सुंदर असून स्व.विनायक मेटे यांनी या भागात नेहमीच आपलेपणाची भूमिका घेतली होती. विकास कामे करत असताना सभागृह असो. कोविडच्या कठीण काळात प्रत्येक घरात अन्नधान्याची किट असो असे अनेक विधायक कामे स्व. विनायक मेटे यांनी या भागात केले आहे. गावातील नागरिकांनी मला येथे बोलून माझा सन्मान केला यासाठी मी सर्व गावकर्यांचे आभारी असून स्व. विनायक मेटे यांचे कार्य व कपिलधारवाडी गावासाठी नेहमीच विकास कामे करणार असल्याचे गौरव उद्गार सप्ताह निमित्त आलेल्या ज्योतीताई मेटे यांनी काढले.

ओंकार रापतवारचा रंगरेजा जगभरातील रसिकांना भुरळ घालणार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाईला मराठवाड्याची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखलं जातं आणि हीच ओळख कायम ठेवण्यासाठी नव्या पिढीतील युवा संगीतकार ओंकार रापतवार याने आपल्या कलेचा आविष्कार जगभरामध्ये पोहोचवून अंबाजोगाईकरांना सुखद अभिमानाचा क्षण निर्माण करून दिला आहेअत्यंत कमी वयात आणि वेळेत एकाच वेळी अनेक वाद्य वाजवणारा,

अत्यंत कमी वयात काही वर्षांपुर्वी ''दि रेन'' हा स्वत:चा संगीत अलबम काढून आपले सांगितीक करीयर सुरुवात करुन आंध्रप्रदेशातील दोन चित्रपटांना पार्श्वसंगीत देवून

आंध्रचित्रपट सृष्टीत स्वत:ची नवी ओळख निर्माण करणारा, मराठवाड्यातील अनेक नवोदित गायकांच्या गाण्यांना संगीतबद्ध करून प्रसिध्दीच्या झोतात आलेला ओंकार आता परदेशातील रसिकांना मोहित करण्यासाठी जातोय. संगीत साहित्य क्रीडा या क्षेत्रामध्ये अंबाजोगाईकरांनी आपला स्वतंत्र ठसा निर्माण केलेलाच आहे. परंतु या सर्वांमधून आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारा युवा संगीतकार ओंकार हा आगळावेगळाच म्हणावा लागेल. शास्त्रीय तबलावादनापासून आपल्या अध्ययनाला सुरुवात करणाऱ्या ओंकारने आज उत्तम कंपोजर आणि जगभरातील विख्यात गायकांना साथसंगत करणारा ड्रमर अशी वेगळी ओळख निर्माण केली आहे. जून जुलै ऑगस्ट सप्टेंबर २०२४ या चार महिन्याच्या कालावधीमध्ये ओंकारच्या रंगरेजा हा ग्रुप तांझानिया इथोपिया तसेच आफ्रिका खंडातील साउथ आणि वेस्ट आफ्रिकेमध्ये आपला कलाविष्कार सादर करून जगभरातील रसिकांना भुरळ घालणार आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून रंगरेजा ग्रुप इंडियन क्लासिकल, सुफी साँग, वेस्टर्न फ्युजन, सोलो ,बॉलीवूड साँग त्याचबरोबर पाश्चात्य संगीत रसिकांसाठी इंग्लिश साँगही सादर करणार आहे. ओंकारच्या नेतृत्वाखाली परदेशवारीवर निघालेल्या या रंगरेजा ग्रुपमध्ये रणबीर सिंग - गिटार, भैरवी पाटील - शास्त्रीय गायिका , सौरभ - बासरी ,शाकीब - बेस गिटार यांची साथसंगत लाभणार आहे. सध्या नवीन पिढीमध्ये अनेक युवा संगीतकार नावारूपाला येत आहेत, प्रत्येकाची काही ना काही तरी वेगळी खासियत आहे. परंतु या प्रचंड स्पर्धेमध्येसुद्धा ओंकारने आपली स्वतःची ओळख निर्माण केलेली आहे. स्वतः संगीतकार आणि उत्तम कलावंत म्हणून प्रसिद्धीच्या वलयात असतानाच आपल्या कलेचा लाभ येणाऱ्या भावी पिढीला व्हावा यासाठी त्याने अंबाजोगाई मध्ये सत्येंदू फाउंडेशन संचलित बॉम्? म्युझिक स्कूलची उभारणी केलेली असून या माध्यमातून शास्त्रीय उपशास्त्रीय पाश्चात्य लोकसंगीत या सर्वच कला प्रकारातील बारकावे लक्षात घेऊन त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना घडवले जात आहे. ओंकारचा कलावंत म्हणून सादरीकरणासाठी हा पहिलाच परदेश दौरा आहे. या दौऱ्यामध्ये हजारो पाश्चात्य रसिकांसमोर ओंकारला आपली कला सादर करण्याची उत्तम संधी या माध्यमातून मिळालेली आहे आणि हा फक्त ओंकारसाठीच नव्हे तर पूर्ण अंबाजोगाईकरांसाठी प्रचंड अभिमानाचा क्षण आहे. ओंकारणे याच पद्धतीने कलाक्षेत्रामध्ये यशाची शिखरे पदाकांत करावीत यासाठी त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

यापूर्वीही अनेक कलावंतांनी सादरीकरणासाठी परदेश वाऱ्या केलेल्याच आहेत परंतु ओंकार आपल्या रंगरेजा या कार्यक्रमाच्या माध्यमातून हजारो लाखो पाश्चात्य रसिकांसमोर फक्त कलाच सादर करणार आहे असं नव्हे तर त्याची ज्या पद्धतीने जडणघडण झाली आहे त्या पद्धतीने तो तेथील लाखो रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवेल हे नक्की. आणि एक गुरु म्हणून या लाडक्या शिष्याचा मला सार्थ अभिमानाचा आहे.

-गुरू तालमार्तंड प्रकाश बोरगावकर

आफ्रिका खंडातील साउथ वेस्ट तसेच इथोपिया टांझानिया इत्यादी देशात सलग चार महिने ओंकारचे लाईव्ह कॉन्सर्ट अंबाजोगाई करांसाठी प्रचंड अभिमानाचा क्षण

पान ६ वरून...

अंबाजोगाईच्या जोधाप्रसादजी

तृतीय क्रमांक मिळवला आहे. जोधाप्रसादजी मोदी महाविद्यालयातील एकूण १०८ विद्यार्थ्यांपैकी ९९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यासोबतच कला शाखेतुन कु. पाठक रुचिता श्रीराम या विद्यार्थिनीने ७८.५०%गुण मिळवत महाविद्यालयातुन सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळवला आहे. तर पवार सोनाक्षी मोतीराम हिने ७२.६७% गुण प्राप्त करून सर्व द्वितीय त्याचबरोबर चि. काशीकर तेजस महादेव या विद्यार्थ्यांने ६९.३३% गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला आहे.

महाविद्यालयातील सर्व यशवंत व गुणवंत विद्यार्थ्यांना त्याच्या घवघवीत यशाबद्दल संस्थापक राजकिशोर मोदी,प्रा डॉ बी आय खडकभावी, कार्यकारी संचालक संकेत मोदी, मार्गदर्शक प्रा. डॉ डी एच थोरात, प्रा. वसंत चव्हाण, महाविद्यालयाचे प्राचार्य चंद्रकांत गायकवाड, विभाग प्रमुख मीना सोनवणे, संस्थेचे सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या आहेत.

तेलगाव रोडवरील भारतीय

चारला बंद होताच बैंके ची थारे बंद करून ग्राहकाचा खातेदाराचा प्रवेश बंद केला जातो खातेदार ग्राहक आला तर बैंक वेळ संपला असे बंद दारातून सांगून खातेदाराला हाकलले जाते त्यामुळे येथील कर्मचारी व अधिकारी यांचे मनमानी कारभाराचा कळस झाला असून ग्राहक वैतागून गेले आहेत तात्काळ येथील मनमानी थांबवावी व ग्राहकाना न्याय द्यावा आशी मागणी खातेदार वर्गातून होत आहे.

गेवराई बसस्थानक प्रवेशद्वारावर

वाहने वेडी - वाकडी उभी असतात . त्याला शिस्त नाही . आगाराने उत्पन्नाची साधने वाढविली पण सुविधा दिल्या जात नाहीत . बऱ्याचदा चालकाला बस उभी करायला जागा नसते . त्यामुळे प्रवाशांचे हाल होतात . बसस्थानकात पोलिस ड्युटी अनिवार्य आहे . त्यांच्यावर आगारप्रमुखाचे दुर्लक्ष आहे . गर्दीच्या वेळी पाकिट मारणे ,चेन ओढणे अशा घटना वारंवार घडतात . बसेस काही अंतरावर गेल्यावर बंद पडतात . बस स्थानकामध्ये तीव्र उन्हाळ्याची गरज म्हणून पानपोई सुरू करणे आवश्यक होते . परंतु दाखविण्यासाठी दोन रांजण भरून पाणी ठेवले आणि आपली जबाबदारी संपली अशा अविर्भावात आगार प्रमुख वावरत आहेत . हे बसस्थानक फक्त सकाळचे वेळेसच झाडझुड करून साफ स्वच्छ केले जाते परंतु दिवसातून दोन-तीन वेळेस बस स्थानक स्वच्छ करणे आवश्यक आहे .बस स्थानकामध्ये बीडहून येणाऱ्या बसेस खड्डा ओलांडत असताना कोणत्याही क्षणी एखाद्या बाजूला पलटी होवू शकतात . त्यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता आहे . इतर गोष्टींना प्राधान्य न देता या खड्डा दुरुस्तीकडे प्राधान्याने लक्ष द्यावे, अशी प्रवासी प्रवासी नागरिकांनी मागणी केली आहे.

बॅडमिंटनपटूने चंपावती क्रिडा

तर १९ वर्षा खालील डब्बल गटात प्रणव समुद्रे व साहील खतीब यांनी प्रथम क्रमांक पटकावला या पाच ही खेळाडूने चंपावती क्रिडा मंडळ चांगलेच गाजवले जिंकलेले सर्व खेळाडू हे अंबाजोगाई येथिल के. एस. शेटे बॅडमिंटन ॲकाडमी चे विद्यार्थी आहेत. या सर्व विजेत्या खेळाडूंना कैलास निळकंठअप्पा शेटे यांचे मार्गदर्शन मिळाले आहे .या सर्व विजेत्या खेळाडूंना मंडळाचे बळीराम गवते,हानीप सर,सांगोळे सर, महादेव धांडे यादी मान्यवरांच्या हस्ते ट्रौपी , मानचिन्हासह प्रशस्तिपत्र देवुन गौरविण्यात आले या यशस्वी खेळाडुंचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

जवाहर उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावी कला शाखेचा निकाल ९७.२९ टक्के

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेत केसापुरी वसाहत येथील जवाहर उच्च माध्यमिक विद्यालयाचा कला शाखेचा निकाल ९७.२९ टक्के लागला असून साक्षी कृष्णा खिरे ७९.१७, अनिकेत दिपक साळवे ७३.३३, आरती अर्जून फुलगे ७२.१७ असे गुण घेऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपली यशस्वी परंपरा कायम राखली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रा.शंकर राठोड, प्रा.संदिप लऊळकर, प्रा.निर्मला चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल नवविकास मंडळाचे अध्यक्ष ॲड.एस.आर.शर्मा, कार्यवाह माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख, उपाध्यक्ष ॲड. आर.डी.भिलेगावकर, सहकार्यवाह आर.बी.देशमुख, संचालक शिरीष देशमुख, डॉ.सचिन देशमुख, प्राचार्य अभिमन्यु इबिते, पर्यवेक्षक संतोष जोशी यांनी अभिनंदन केले.

महाराणी ताराबाई विद्यालयाची बारावीच्या उज्वल यशाच्या निकालांची परंपरा कायम

विज्ञान शाखेचा १००% तर कला शाखेचा ९७.६१ % निकाल जाहीर

वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे यांनी फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये घेतलेल्या बारावी परीक्षाचा निकाल मंगळवार दि.२१ मे २०२४ रोजी मंडळाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला.यामध्ये वडवणी शहरातील शैक्षणिक क्षेत्रात नामांकित असलेल्या महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता बारावी विज्ञान शाखेचा १००% तर कला शाखेचा ९७.६१ % तर दोन्ही शाखेंचा एकूण सरासरी ९९.११% निकाल लागला आहे. प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी विद्यालयाने उज्वल यशाच्या निकालाची परंपरा कायम ठेवली असून विज्ञान शाखेतून कु.भाग्यश्री बापूराव मुंडे ८७.८३ % गुण घेऊन प्रथम क्रमांक आला आहे तर ८५.१७ % गुण घेऊन कु.अंजली आसाराम मस्के हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे तर चि.अभिषेक अशोक आंधळे यांनी ८३.८३% गुण घेऊन तृतीय क्रमांक आला आहे. तसेच कला शाखेतून कुमारी अलका संजय गांधले हिने ८५.५०% गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळविला आहे.तर कु.प्रतीक्षा भागवत मुंडे ८४.१७ % गुण घेऊन द्वितीय क्रमांक आला आहे तर कु.काजल बिभीषण लोंढे ८०.१७ % गुण घेऊन तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे .

या यशाबद्दल संस्कार शिक्षण मंडळाचे सचिव तथा माजी आमदार केशवराव आंधळे तसेच विद्यालयाच्या शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते संजय भाऊ आंधळे, वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रंजीत भैय्या धस,संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे व विद्यालयाचे प्राचार्य राऊत, सर उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,श्री.डोईफोडे सर, श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम यांच्यासह विद्यालयातील शिक्षक - शिक्षकांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व त्यांचे पालक आणि मार्गदर्शक अध्यापन करणारे विद्यालयाचे एचएससी बोर्ड परीक्षेचे परिक्षा विभाग प्रमुख प्रा.कांबळे सर, प्रा.मुंडे सी.व्ही.सर,प्रा.अंडील सर,प्रा.डाके सर,प्रा.केदार सर,प्रा.राठोड सर,प्रा.मुंडे बी.डी.सर,प्राध्यापिका कचरे मॅडम,प्राध्यापिका उघडे मॅडम,सावंत सर या सर्वांचे हार्दिक अभिनंदन करून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाचे बारावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश

माजलगाव । प्रतिनिधी

येथील भा. शि. प्र. संस्था अंबाजोगाई संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी बारावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.या परीक्षेत महाविद्यालयाचा एकूण निकाल ९६ % लागला आहे. यामध्ये शाखानिहाय निकाल पुढील आहे -वाणिज्य शाखा ९८.७९%, विज्ञान शाखा ९७.६६%आणि कला शाखा ९१.७५%.

निकालचे प्रमुख वैशिष्ट्य वाणिज्य शाखेचे नव्वद टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले चार विद्यार्थी आहेत. तसेच संस्कृत विषयात शंभर गुण घेतलेले चाळीस विद्यार्थी आहेत.

शाखानिहाय प्रथम तीन विद्यार्थी पुढीलप्रमाणे आहेत वाणिज्य -१)कु दिशा मुंजाबा पठाडे (९२.३३%) २)कु. वैष्णवी शंकर शिंदे (९२%) ३) कु. देवकी दत्तात्रय पायघन (९०.६७%) ४)कु. अंकिता श्याम शिंदे (९०.१७%)

विज्ञान - १)कु. समीक्षा उमेश जोगी (८६.१७%) २)व्यंकटेश परमेश्वर पवार (८५.८३%) ३)आविष्कार अनंत जोशी (८४.६७%) कला शाखा -१)चि. अशोक लक्ष्मण शिनगारे (८०.१७%) २)प्रतीक्षा नारायण थोरात (८०%)

३)पूनम ज्ञानेश्वर घुगे (७८.६७%)

महाविद्यालयाच्या यशाबद्दल भा.शि. प्र. संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्रजी आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, प्रकाशजी दुगड, श्री सिद्धेश्वर संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्रजी रेदासनी, कार्यवाह ऍड. विश्वासराव जोशी, महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष अभयजी कोकड, प्राचार्य डॉ सुहास मोराळे,

उपप्राचार्य प्रा संतोष लिंबकर, कार्यालय अधिक्षक ऊत्तरेश्वर आनेवार, डॉ गजानन होन्ना, डॉ युवराज मुळ्ये प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर, प्रा. अंकुश साबळे, प्रा. प्रवीण गिलडा प्रा. राघवेंद्र मुळी, प्रा परमेश्वर खेत्री प्रा अभय येवतेकर यांचेसह सर्व प्राध्यापक कर्मचारी वृंदानी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

टाकळसिंग येथे ह.भ.प. रामराव महाराज ढोक यांचे हरीकिर्तन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील टाकळसिंग येथील वै. आजिनाथ कोंडीबा जगताप यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त रामायणाचार्य ह.भ.प. रामराव महाराज ढोक यांचे गुरुवारी जाहीर हरिकीर्तन होणार आहे.या कीर्तनाचा लाभ घेण्याचे आवाहन जगताप परिवाराच्यावतीने करण्यात आले आहे.

वै.आजिनाथ कोंडीबा जगताप यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त दि.२३ मे रोजी ९ ते ११ यावेळात विदर्भरत्न रामायणाचार्य ह.भ.प.

रामराव महाराज ढोक यांचे जाहीर कीर्तन जगतापवस्ती टाकळसिंग येथे होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन केले आहे.या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जगताप परिवार व ग्रामस्थांनी केले आहे.

राज्यात आतापर्यंत २ कोटी ४४ लाख जनावरांचे इअर टॅगिंग पूर्ण

पुणे : येत्या १ जूनपासून इअर टॅग (बिल्ला) नसलेल्या पशुधनाची खरेदी-विक्री करता येणार नाही, तसेच बैलगाडा शर्यतीत सहभाग घेता येणार नाही. या पार्श्वभूमीवर राज्यात आतापर्यंत गाई व म्हशींचे टॅग करण्याची प्रक्रिया ११४ टक्के पूर्ण झाली आहे. अशी माहिती पशुसंवर्धन विभागाकडून देण्यात आली आहे. यात प्रामुख्याने शेळ्या व मेंढ्यांचे ७२ टक्के टॅग पूर्ण झाले असून, राज्यातून एकूण २ कोटी ४४ लाख पशुंचा यात समावेश करण्यात आला आहे.

नॅशनल डिजिटल लाइव्हस्टॉक मिशन (एनडीएलएम) अंतर्गत 'भारत पशुधन प्रणाली'मध्ये इअर टॅगिंग केलेल्या सर्व पशुधनाच्या सर्वकष नोंदी घेण्यात येत असून, शेतकऱ्यांनी आपल्या पशुधनाचे इअर टॅगिंग करून घेणे बंधनकारक केले आहे. इअर टॅगशिवाय पशुधनास पशुवैद्यकीय संस्था, दवाखान्यामधून कोणतीही पशुवैद्यकीय सेवा देण्यात येऊ नये. तसेच कत्तलखान्यात टॅग असल्याशिवाय म्हैसवर्गीय जनावरांची कत्तल करण्यास परवानगी देण्यात येऊ नये, असेही स्पष्ट

करण्यात आले आहे. नैसर्गिक आपत्ती, विजेचा धक्का तसेच वन्यपशुंच्या हल्ल्यामुळे मृत्युमुखी पडलेल्या पशुधनास इअर टॅगिंग केलेली नसल्यास नुकसान भरपाईची रक्कम देण्यात येऊ नये.

जनगणना संख्येपेक्षा जास्त टॅग

राज्यात २०१९ च्या पशुगणनेनुसार १ कोटी ३९ लाख ९२ हजार ३०४ म्हशी असून, आतापर्यंत ६२ लाख २९ हजार ५०९ म्हशींचे टॅगिंग पूर्ण झाले आहे. तर ५६ लाख ३ हजार ६९२ गाई असून आतापर्यंत १ कोटी ६२ लाख ८३ हजार ५१२ जनावरांचे टॅगिंग झाले आहे. ही संख्या जनगणना संख्येपेक्षा जास्त आहे. शेळ्या व मेंढ्यांमध्ये टॅगिंग करताना कळपातील एका नराला बिल्ला लावला जात असून, त्या कळपातील अन्य जनावरांची केवळ नोंदणी केली जात असल्याने ही संख्या जास्त असल्याचे पशुसंवर्धन विभागाने म्हटले आहे.

कोणत्याही पशुधनाची वाहतूक इअर टॅगिंग असल्याशिवाय करता येणार नाही, तसे केल्यास पशुधनाचे मालक व वाहतूकदार यांच्यावर उचित कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

केळीवरील 'काळी बोंडी कूज' रोगाचे वेळीच करा नियंत्रण!

केळी पिकावरील जळका चिरूट ज्याला आपण काळी बोंडी कूज म्हणून सुद्धा ओळखतो हा रोग तीन ते चार वर्षांपूर्वी कमी घातक रोग म्हणून ओळखला जायचा. परंतु काही काळापासून हा एक महत्त्वाचा रोग म्हणून उदयास येत आहे ज्याचे मुख्य कारण म्हणजे वातावरणातील अति आर्द्रता. हा रोग प्रामुख्याने ट्रॅचिस्फेरा फ्रुक्टिजेना या बुरशीमुळे होतो आणि काही वेळा व्हर्टिसिलियम थियोब्रोमामुळे देखील होतो. हा रोग वारा किंवा पावसामुळे पसरतो. पावसाळ्यात केळीच्या फुलांच्या अवस्थेत निरोगी उतींवर बुरशीचा हल्ला होतो. ते फुला द्वारे केळीला संक्रमित करते. तेथून पुढे ते फळांच्या टोकापर्यंत पसरते आणि कोरड्या कुजेला कारणीभूत ठरते जे राखेसारखे दिसते आणि सिगारसारखे दिसते, ज्यामुळे रोगाला सिगार एंड रॉट असे नाव दिले जाते. स्टोरेजमध्ये किंवा वाहतुकी दरम्यान या रोगाचा प्रसार संपूर्ण फळांवर होतो

रोगाची लक्षणे : हा रोग फळांच्या टोकांवर येत असून टोके कोरड्या, तपकिरी ते काळी कुजल्यासारखी दिसतात. बुरशीची वाढ प्रत्यक्षात फुलांच्या अवस्थेपासून सुरू होते आणि फळांच्या परिपक्वतापूर्वी किंवा त्यापूर्वी दिसून येते. प्रभावित भाग तपकिरी बुरशीच्या वाढीने झाकले जातात. जे स्क्रॅबच्या जळलेल्या टोकावर राखेसारखे दिसतात. फळांचा आकार असामान्य दिसतो, त्यांच्या पृष्ठभागावर साचा दिसून येतो आणि त्वचेवर जखम स्पष्टपणे दिसतात.

रोगाचे जैविक नियंत्रण : या रोगास कारणीभूत असलेल्या बुरशीच्या नियंत्रणासाठी बेकिंग सोडावर आधारित फवारणी केली जाऊ शकते. ही फवारणी करण्यासाठी, ५० ग्रॅम बेकिंग सोडा पाण्यात विरघळवून २५ मिली द्रव साबण प्रति लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार केले जाते. संसर्ग टाळण्यासाठी, हे मिश्रण संक्रमित फांद्या आणि जवळच्या फांद्यावर फवारावे. हे केळीच्या बोटांच्या पृष्ठभागाची पीएच पातळी वाढवते आणि बुरशीच्या वाढीस प्रतिबंध करते.

रासायनिक नियंत्रण : शक्य असल्यास जैविक उपचारासह प्रतिबंधात्मक उपायांसह एकात्मिक दृष्टिकोनाचा नेहमी विचार करा. हा रोग सहसा किरकोळ महत्त्वाचा असतो आणि क्वचितच रासायनिक नियंत्रणाची आवश्यकता असते. मात्र गेल्या तीन वर्षात या आजाराच्या तीव्रतेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे कारण अतिवृष्टीमुळे वातावरणात भरपूर ओलावा निर्माण झाला आहे, जो या आजाराच्या प्रसारासाठी महत्त्वाचा आहे. त्यामुळे रासायनिक नियंत्रणासाठी

केळीच्या बाधित घडावर एकदा मॅन्कोझेब, ट्रायओफेनेट मिथाइल किंवा मेटालॅक्सिल १ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी आणि नंतर प्लास्टिकने झाकून टाकावे. कॉपर ऑक्सिक्लोराईड स्प्रे सारखी कॉपर बुरशीनाशके देखील प्रभावी ठरू शकतात. परंतु फवारणीच्या १० दिवसांनंतरच फळांची काढणी करावी.

शेतकऱ्यांना कापूस बियाणे टोकनद्वारे वितरित केली जाणार

पुणे : बहुतांश शेतकरी कापूस पेरणीत रस दाखवत असल्याने कापूस बियाणांची मागणी झपाट्याने वाढली आहे. कापूस बियाणे खरेदीसाठी दुकानांबाहेर शेतकऱ्यांच्या लांबच लांब रांगा दिसत आहेत. शेतकरी तासनतास वाट पाहिल्यानंतर सुधारित कापूस बियाणे खरेदी करू शकत आहेत. शेतकऱ्यांचा हा प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासनाने आता टोकन पद्धत सुरू करण्याची योजना आखली असून, त्याद्वारे कापसाचे सुधारित बियाणे शेतकऱ्यांना सहज उपलब्ध होणार आहे.

कापसाची लागवड भारतातील अनेक राज्यांमध्ये केली जाते. यामध्ये उत्तर प्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र, पंजाब, मध्य प्रदेश, गुजरात, आंध्र प्रदेश आणि कर्नाटक यांचा समावेश होतो. देशातील बहुतांश शेतकरी कापसाची पेरणी करत आहेत. कारण यावेळी शास्त्रज्ञांनी कापसावरील सर्वात घातक रोग असलेल्या गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी मे महिन्यातच कापूस पेरण्याचा सल्ला दिला आहे. कापूस बियाण्यांच्या वितरणात कोणत्याही प्रकारचा काळाबाजार किंवा अनियमितता आढळून आल्यास तत्काळ एफआयआर नोंदवून दंडात्मक कारवाई करण्यात येईल, अशा इशारावजा सूचना कृषी विभाग आणि शासनाकडून देण्यात आल्या आहेत. सध्या शेतकऱ्यांमध्ये रासी बियाणे (६५९) आणि निजुवेदू बियाणे (आशा-१) कापूस बियाण्यांना विशेष मागणी आहे. घाऊक विक्रेत्यांना विशेष जातीचे कापूस बियाणे टोकनद्वारे संबंधित क्षेत्रानुसार प्राप्त प्रमाणात वितरित करण्यात येणार आहे.

कपाशीवर गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव : कापूस पिकावर गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव अत्यंत धोकादायक मानला जातो. या किडीमुळे कापूस पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. गुलाबी बोंडअळीचा हल्ला संपूर्ण कापूस पीक नष्ट करू शकतो. या किडीच्या ओळखीबद्दल सांगायचे तर, हा किडा फारच लहान आणि परिपक्व अवस्थेत गडद तपकिरी रंगाचा असतो. त्याच्या पुढच्या पंखांवर काळे डाग असतात आणि मागच्या पंखांना कडा असतात. या किडीच्या सक्रिय होण्याची वेळ रात्रीची असते. त्याचबरोबर दमट वातावरणात गुलाबी सुरवंट किडीचा हल्ला अधिक सक्रिय होतो, जो पिकाच्या शेवटच्या अवस्थेपर्यंत राहतो आणि पिकाचेही खूप नुकसान होते. अशा स्थितीत या किडीचा वेळीच प्रतिबंध करण्याकडे शेतकऱ्यांनी लक्ष देणे गरजेचे आहे, अन्यथा संपूर्ण पीक उद्ध्वस्त होऊ शकते.

खरीप हंगामासाठी पुनर्रचित हवामानावर आधारित पीक विमा योजनेची अंमलबजावणी

औरंगाबाद : महाराष्ट्र सरकारने प्रधानमंत्री फसल बीमा योजना (पीएमएफबीवाय) २०२० च्या खरीप हंगामासाठी पालघर, रायगड, धुळे, पुणे, औरंगाबाद, हिंगोली, अकोला आणि भंडारा या जिल्ह्यांतील कर्जदार आणि विना -कर्जदार शेतकऱ्यांसाठी एचडीएफसी एर्गो जनरल विमा कंपनीला अधिकृत केले आहे. पीएमएफबीवाय योजना दुष्काळ, पूर, कोरडे गवत, भूस्खलन, चक्रीवादळ, कीटक, रोग आणि इतर अशा विस्तृत बाह्य जोखमीमुळे पिकांच्या उत्पन्नातील कोणत्याही नुकसानाविरूद्ध विमा देते.

उत्पादनातील तोटा निश्चित करण्याच्या उद्देशाने राज्य सरकार या योजनेसाठी अधिसूचित केलेल्या

भागातील अधिसूचित पिकांवर पीक कापणी प्रयोग (सीसीई) घेण्याची योजना आखेल. सीसीई घेतलेल्या उत्पन्नाची आकडेवारी जर कमी झाली असेल तर शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पन्नातील तूट सोसावी लागली तर दावे शेतकऱ्यांना दिले जातील. ही पिकांची पूर्व पेरणी, काढणी आणि काढणीनंतरच्या जोखमीसह पीक चक्रातील सर्व टप्प्यांसाठी विमा संरक्षण उपलब्ध करुन देते. पीएमएफबीवाय योजनेतील सर्व उत्पादने कृषी विभागाने मंजूर केली आहेत. पालघर, रायगड, धुळे, पुणे, औरंगाबाद, हिंगोली, अकोला आणि भंडारा या जिल्ह्यातील शेतकरी आपापल्या जिल्ह्यातील संबंधित बँकांमध्ये, सामान्य सेवा केंद्रांकडे (सीएससी) संपर्क साधू शकतात किंवा पीएमएफबीवाय योजने अंतर्गत वरील पिकांसाठी विमा संरक्षण मिळविण्यासाठी अधिकृत एचडीएफसी एजंटशी संपर्क साधू शकतात. विमा संरक्षण मिळविण्यासाठीच्या वैधता कालावधीचा तपशील कृषी विभागाच्या वेबसाइटवर शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असेल. या योजनेंतर्गत कव्हर मिळण्याची अंतिम तारीख ३१ जुलै २०२० आहे.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

- १३७७ : पोप ग्रेगोरी अकराव्याने पाच पोपचे फतवे काढून इंग्लिश तत्त्वज्ञानी जॉन वायक्लिफची मते खोडून काढण्याचा प्रयत्न केला.
- १७६२ : स्वीडन आणि प्रशियामधे हॅम्बुर्गचा तह झाला.
- १९०६ : अथेन्समध्ये तिसरे ऑलिंपिक खेळ सुरु. काही काळानंतर यांची अधिकृत खेळ म्हणून मान्याता काढून घेण्यात आली.
- १९०६ : राइट बंधूंना त्यांच्या उडणाऱ्या यंत्रासाठी पेटंट देण्यात आला.
- १९१५ : स्कॉटलंडच्या ग्रेटना ग्रीन गावात ३ रेल्वेगाड्यांची टक्कर होऊन २२७ जण ठार आणि २४६ जण जखमी झाले.
- १९१५ : प्रथम विश्व युद्धादरम्यान सोवियत राष्ट्र इटलीने मित्र राष्ट्र ऑस्ट्रिया, हंगेरी आणि जर्मनी विरुद्ध युद्ध पुकारले.
- १९२७ : चीनच्या झिनिंग जवळ झालेल्या ८.३ तीव्रतेच्या भूकंपात २,००,००० लोक ठार झाले.
- १९४२ : दुसरे महायुद्ध मेक्सिकोने दोस्त राष्ट्रांच्या बाजूने युद्धात उडी घेतली.
- १९६० : ग्रेट चिलीयन भूकंप हा ९.५ तीव्रतेचा जगातील सर्वात शक्तिशाली भूकंप आहे.
- १९६१ : हुंडाबंदी विधेयकाला राष्ट्रपतींची संमती मिळून हुंडाबंदी कायदा अस्तित्त्वात आला.
- १९७२ : सिलोनने नवीन राज्यघटना स्वीकारुन ते प्रजासत्ताक बनले. त्या देशाचे श्रीलंका असे नामकरण झाले आणि त्याने राष्ट्रकुल देशांत प्रवेश केला.
- १९८७ : मेरठ जिल्ह्यात हाशिमपूरा हत्याकांड झाले.
- १९८९ : अग्नी' या मध्यम पल्ल्याच्या क्षेपणास्त्राचे ओरिसातील मंडीपूर येथून यशस्वीरीत्या प्रक्षेपण करण्यात आले.
- २००४ : भारताचे पंतप्रधान म्हणून मनमोहन सिंग यांचा शपथविधी.
- २००९ : भारताचे पंतप्रधान म्हणून मनमोहन सिंग यांचा दुसऱ्यांदा शपथविधी.
- २०१५ : आयर्लंड देश सार्वजानिक जनमतदानंतर समलिंगी विवाहाला कायदेशीर ठरवण्यासाठी जगातील पहिला देश बनला.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

- १४०८ : हिंदू संत अन्नामचार्य यांचा जन्म. (मृत्यू: ४ एप्रिल १५०३)
- १६८८ : अलेक्झांडर पोप, इंग्लिश कवी.
- १७७२ : सतीची चाल कायदेशीरपणे बंद करणारे व अनेक भाषांतून प्रावीण्य मिळविलेले थोर समाजसुधारक राजा राममोहन रॉय यांचा बंगालमध्ये जन्म झाला.
- १७८३ : विद्युत चुंबक आणि विद्युत मोटर चे शोधक विल्यम स्टर्जन यांचा जन्म. (मृत्यू: ४ डिसेंबर १८५०)
- १८१३ : जर्मन संगीतकार, संगीतसंयोजक व दिग्दर्शक रिचर्ड वॅग्नर यांचा जन्म. (मृत्यू: १३ फेब्रुवारी १८८३)
- १८५९ : स्कॉटिश डॉक्टर व शेरलॉक होम्स या गुप्तहेरकथांचे लेखक सर आर्थर कॉनन डॉइल यांचा जन्म. (मृत्यू: ७ जुलै १९३०)
- १८७१ : संस्कृत विद्वान, भाषांतरकार व शास्त्रसुधारक विष्णू वामन बापट यांचा जन्म. (मृत्यू: २० डिसेंबर १९३३)
- १९०५ : इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शकाचे सहसंशोधक बोडो वॉन बोररी यांचा जन्म. (मृत्यू: १७ जुलै १९५६)
- १९०७ : ब्रिटिश अभिनेता, दिग्दर्शक व निर्माता सर लॉरेन्स ऑलिव्हिये यांचा जन्म. (मृत्यू: ११ जुलै १९८९)
- १९२५ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय कवी, व रशियन भाषेचे हिंदीत भाष्यांतर करणारे भारतीय भाष्यकार मदन लाल मधु यांचा जन्मदिन.
- १९४० : इरापल्ली प्रसन्ना, भारतीय क्रिकेट खेळाडू.
- १९४८ : भारतीय अभिनेता आणि पटकथालेखक नेदुमुदी वेणू यांचा जन्म.
- १९५९ : भारतीय राजकारणी मेहबूबा मुफ्ती यांचा जन्म.
- १९८४ : फेसबुकचे सह-संस्थापक डस्टिन मॉस्कोविट्झ यांचा जन्म.
- १९८७ : सर्बियाचा टेनिस खेळाडू नोव्हान जोकोव्हिच यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

- १५४५ : भारतीय शासक शेरशाह सूरी यांचे निधन.
- १८०२ : अमेरिकेची पहिली फर्स्ट लेडी मार्था वॉशिंग्टन यांचे निधन. (जन्म: २ जून १७३१)
- १८८५ : जागतिक कीर्तीचे फ्रेन्च कादंबईकार, कवी आणि लेखक व्हिक्टर ह्यूगो यांचे निधन. (जन्म: २६ फेब्रुवारी १८०२)
- १९९१ : भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे संस्थापक व कामगार पुढारी कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे यांचे निधन. (जन्म: १० ऑक्टोबर १८९९)
- १९९५ : चित्रकार व शिल्पकार रविंद्र बाबुराव मेस्त्री यांचे निधन.
- १९९८: लेखक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांचे निधन. (जन्म: १ जानेवारी १९२८)
- २००३ : डॉ. नित्यनाथ ऊर्फ नीतू मांडके भारतीय हृदयरोगतज्ञ.
- २०११ : वैदिक व बौद्ध काळातील सुप्रसिद्ध भारतीय इतिहासकार तसचं, अलाहाबाद विद्यापीठातील प्राचीन इतिहासाचे प्राध्यापक व कुलगुरू गोविंदचंद्र पांडे यांचे निधन.

अल्पाइन जातीची शेळी दिवसाला देते ५ लिटर दूध

शेळीपालन असा व्यवसाय आहे तो कमीत कमी जागेमध्ये सुरू करता येतो आणि खर्च देखील इतर व्यवसायांच्या तुलनेत खूप कमी लागतो. या व्यवसायात देखील आता अनेक प्रकारचे तंत्रज्ञान आल्यामुळे अनेक सुशिक्षित तरुण आता या व्यवसायाकडे वळत असून व्यावसायिक दृष्टिकोनातून हा व्यवसाय आता मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. शेळीपालनासाठी शेळ्यांच्या जातींची निवड यावर देखील तुमच्या व्यवसायाचे यशाचे गणित ठरलेले असते. दर्जेदार आणि जातिवंत अशा जातींची निवड शेळीपालनासाठी करणे खूप गरजेचे असते.

जातिवंत शेळ्यांची निवड : शेळीपालन हा शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत बनत आहे. इतर गुरांच्या तुलनेत त्यांच्या संगोपनात हानी होण्याची शक्यताही कमी असते. अशा स्थितीत पशुपालकांनी उत्तम जातीच्या शेळ्यांची निवड करून संगोपन सुरू केल्यास नफ्यात आणखी वाढ होऊ शकते. शेळ्यांच्या अनेक जाती आहेत ज्यांचे पालन शेतकरी किंवा व्यावसायिक करतात.

अल्पाइन जातीची शेळी : अल्पाइन शेळी जातीची उत्पत्ती स्वित्झर्लंडमध्ये झाली आहे. अल्पाइन प्राण्यांच्या दुधात चरबीचे प्रमाण ६ टक्के आहे. आणि एकूण वार्षिक दूध उत्पादन १.६ टन आहे.

जे न्युबियन शेळ्यांपेक्षा खूप जास्त आहे. हा विक्रम युनायटेड स्टेट्समध्ये सेट केला गेला होता. प्रति कॅलेंडर वर्षात २.२ टन दुधाचे सूचक प्राप्त करणे शक्य होते.

दिवसाला किती लिटर देते दूध? : अल्पाइन शेळी सरासरी दिवसाला ५ लिटरपेक्षा जास्त दूध देते. अर्थातच, योग्य काळजी आणि चांगल्या पोषणामुळे उत्पादकतेमध्ये अल्पाइन शेळ्या सॅनेन शेळ्यांपेक्षा कमी दर्जाच्या नसतात. त्याच्या नाजूक मलईदार चवीने दुध घरगुती कॉटेज चीज आणि कॉटेज चीज बनवण्यासाठी आधार म्हणून काम करते.

अल्पाइन जातीच्या शेळीचे वैशिष्ट्य: अल्पाइन शेळीच्या जातीचे एक विशिष्ट वैशिष्ट्य म्हणजे अष्टपैलुत्व. ते उत्पादकतेच्या बाबतीत आघाडीवर आहेत. तर अल्पाइन शेळ्यांच्या दुधाला एक अनोखी विषेश चव असते. याशिवाय, शेळी अत्यंत सुपीक आणि इतर जातींसह पार करण्यासाठी आदर्श आहे, ज्यामुळे त्यांची उत्पादकता, दुधाचे उत्पन्न आणि दुधात चरबीचे प्रमाण वाढते.

दुष्काळाचे दुष्टचक्र भेदण्यासाठी सर्वांनी एकसंघ कृती करण्याचा संकल्प

मराठवाडा पाणी परिषदेची मंथन बैठक: नदीजोड प्रकल्पाला गती द्या

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्यासाठी पश्चिम वाहिनीच्या नदी खोऱ्यातील १६८ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याच्या नदी जोड प्रकल्पास २०१९ मध्ये मंजुरी मिळाली .मात्र आजपर्यंत ओंजळभरही पाणी मराठवाड्याला मिळाले नाही.नदी जोड प्रकल्पाला गती देऊन मराठवाड्याचा दुष्काळ कायमस्वरूपी संपविण्यासाठी अल्प व दीर्घकालीन कालबद्ध कृती कार्यक्रम घोषित करावा अल्पकालीन मध्ये मिशन मोडवर जलसंधारण व धरणातील गाळ काढण्याची कामे ,शाश्वत व प्रभावी सिंचनाकरिता पाणी वापर संस्थांची मोठ्या प्रमाणात स्थापना व सक्षमीकरण ,अपूर्ण प्रकल्प वेळेत पूर्ण करणे ,कालवा दुरुस्ती व मनुष्यबळ उपलब्धता, पाण्याचा कार्यक्षम व उत्पादक वापराकरिता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ,तर दीर्घकालीन मध्ये नदीजोड प्रकल्पाद्वारे गोदावरीत पाणी वळविणे, कृष्णा मराठवाडा प्रकल्प, विदर्भातील अतिरिक्त पाणी मराठवाड्यात वळविणे ही कामे झाली पाहिजेत याकरिता मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे पाठपुरावा व आगामी विधानसभा निवडणुकीत सर्व पक्षाने निवडणूक जाहीरनाम्यात मराठवाड्याचा पाणी प्रश्न सोडविण्याचे अभिवचन द्यावे यासाठी मराठवाडा पाणी परिषद प्रयत्नशील राहणार

आहे.असे मराठवाडा पाणी परिषदेचे अध्यक्ष नरहरी शिवपुरे म्हणाले.

मराठवाडा पाणी परिषदेतर्फे रविवारी पाणी प्रश्नावर ग्रामविकास भवन ठाकरे नगर,सिडको एन २ येथे बैठक घेण्यात आली. याप्रसंगी आधार जलदूत समितीचे अध्यक्ष मा. पंडित अण्णा शिंदे, प्रेरणा फाउंडेशनचे मा. भाऊसाहेब मते, माजी अधीक्षक अभियंता जलसंपदा विभाग डॉ.जयसिंग हिरे, गट शेती प्रणेते डॉ. भगवानराव कापसे यांनी अनुक्रमे शाश्वत व प्रभावी सिंचनाकरिता पाणी वापर संस्था ,गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना मराठवाड्यासाठी वरदान ,मराठवाडा सिंचन अनुशेष निवारणाकरिता कृती कार्यक्रम, ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन योजना पैठण ,पाण्याच्या कार्यक्षम वापराद्वारे कृषी उत्पादकतेत व उत्पन्नात वाढ या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले . उपस्थिता पैकी अनेक मान्यवरांनी दुष्काळ मुक्त मराठवाडा कालबद्ध कार्यक्रमासाठी अनेक मौलिक सूचना केल्या .अध्यक्षीय समारोपप्रसंगी डॉ. सर्जेराव ठोंबरे म्हणाले दुसरा सिंचन आयोग व वेळोवेळीच्या अनुशेष निवारण समित्याने मराठवाडा सिंचन अनुशेष निवारणाकरिता सुस्पष्ट अशा सूचना केलेल्या आहेत .याची प्रत्यक्षात अंमलबजावणी होण्याची गरज आहे. या अंमलबजावणी होण्याच्या प्रक्रियेत मराठवाडा पाणी परिषदेने लक्ष घातले पाहिजे असे मत व्यक्त केले. याप्रसंगी परिषदेचे उपाध्यक्ष मनोहर सरोदे , बाजीराव ढाकणे, दिनेश पारिक, रामचंद्र पिल्दे ,कैलास तवार, भास्कर उघडे ,रवींद्र बोडके ,योगिता तौर होके पाटील,संतोष एरंडे ,डॉ.बाबासाहेब गोजरे ,माऊली मुळे ,भरत थोटे ,कृष्णा पाटील ,अरुण सोनवणे ,प्रा.शिवाजी हुसे ,आपचे वैजिनाथ राठोड व विश्वनाथ दहे यांच्यासह मराठवाड्यातील स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी ,शेतकरी व युवक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या शेवटी मराठवाडा पाणी परिषदेचे बीड जिल्हा प्रमुख बाजीराव ढाकणे यांनी आभार मानले.राष्ट्रगीताने या बैठकीची सांगता झाली.

राजमाता जिजाऊ महाविद्यालयाची यशाची परंपरा कायम

धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील फेब्रुवारी २०२४ मध्ये झालेल्या बारावी बोर्ड परीक्षेत विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले आहे. यामध्ये बारावी विज्ञान शाखेचे एकूण १५२ विद्यार्थ्यांपैकी १५० विद्यार्थी उत्तीर्ण होऊन विज्ञान शाखेचा निकाल ९९.३३% लागला. विज्ञान शाखेतून सर्वप्रथम थोरात देवयानी धनंजय ८९.००%, द्वितीय मुंडे साक्षी संदीप ८७.१७% व तृतीय क्रमांक शिनगारे विशाखा विजय ८६.५०% या विद्यार्थिनींनी प्राप्त केला. वाणिज्य शाखेतील ३३ परीक्षार्थीपैकी ३० विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ९३.७५ टक्के निकाल आहे.

वाणिज्य शाखेतून प्रथम पवार ऋतुजा शंकर ८४.३३%, द्वितीय क्रमांक उडगे तेजस्विनी नारायण ८२.८३% तर तृतीय क्रमांक कुरवडे प्रतीक रतन ७६.६७% या विद्यार्थ्यांनी मिळविला. तर कला शाखेच्या ८५ परीक्षार्थीपैकी ७७ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ९५.०६% निकाल लागला. कला शाखेत प्रथम क्रमांक कसपटे रत्नेश्वर लहू ७०.८३%, द्वितीय गिरी राधा भीमराव ७०.५०% तर तृतीय क्रमांक जाधव रेणुका शंकर ६९.३३% यांनी प्राप्त केला. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी फेब्रुवारी २०२४ बारावी बोर्ड परीक्षेत मिळविलेल्या यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश सोळंके, सचिव सतीश चव्हाण, महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख सदस्य जयसिंग सोळंके, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य लोभाजी चव्हाण, अजयसिंह दिख्खत, महाविद्यालय विकास समितीचे निमंत्रित सदस्य डॉ. राम शिनगारे, जाधव बारावी बोर्ड परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भावी शैक्षणिक शुभेच्छा व्यक्त केल्या.

तसेच प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे, पर्यवेक्षक प्रा. सिद्धेश्वर काळे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विद्यार्थ्यांनी बारावी बोर्ड परीक्षेत यशाची उज्वल परंपरा कायम ठेवली व महाविद्यालयाचे नाव उंचाविले याबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले.

परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात शिक्षण घ्यावे असे सांगितले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सिद्धेश्वर काळे, प्रा. गहिनिनाथ गोयेकर, प्रा. सच्चिदानंद ढेपे, प्रा. प्रताप भानुसे, प्रा. टी. एन. ढवळे, प्रा. जगदीश शिंदे, प्रा. धनराज सोळंके, प्रा. संदीप गायकवाड, प्रा. विराज देशमुख, प्रा. रागिनी सोनवणे, प्रा. राम लोखंडे, प्रा. बांगर, प्रा. वैरागे या सर्व प्राध्यापक वर्गाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी अभिनंदन केले. तसेच सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

थोडक्यात

साधना साळुंकेचे घवघवीत यश

बीड । प्रतिनिधी

नागापूर खुर्द येथील पत्रकार चंद्रकांत साळुंके यांची कन्या साधना साळुंके हिने इयत्ता बारावी सायन्समध्ये ८१ टक्के मिळवून यश संपादन केले आहे. बीड तालुक्यातील नागापूर खुर्द येथील रहिवाशी साधना चंद्रकांत साळुंके हिने १२ बोर्ड परिक्षेत इंग्रजी-५८,मराठी ८६, मॅथ-९०, फिजीक्स-१, केमिस्ट्री ८९, बायलॉजी-९२ गुण प्राप्त केले. तिने मिळविलेल्या या यशाबद्दल अनेकांनी शुभेच्छा दिल्या.

पायल ओमप्रकाश तोतला हिचे यश!

बीड । प्रतिनिधी

बारावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून बलभीम नगर पेठ बीड भागातील महेश गृह उद्योग चे प्रसिद्ध उद्योगपती ओमप्रकाश तोतला यांची मुलगी पायल ओमप्रकाश तोतला हिने बारावी परीक्षेत ९०% गुण घेऊन यश प्राप्त केले आहे. बारावी विज्ञान शाखेत सावरकर महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या पायल ओमप्रकाश तोतला हिने ६०० पैकी ५४० गुण घेत ९०% गुण प्राप्त करत बारावी परीक्षेत यश प्राप्त केले आहे. तिच्या यशाने महाविद्यालयाचे प्राचार्य , प्राध्यापक ,आई रामप्यारी ओमप्रकाश तोतला उद्योगपती ओमप्रकाश तोतला व त्यांच्या परिवाराकडून पायल हिचे अभिनंदन होत असून पुढील कारकीर्द साठी पायल हिला शुभेच्छा देण्यात येत आहे.

जिवे मारण्याची धमकी देत जातीवाचक शिवीगाळ

एक विरोधात गुन्हा दाखल

गेवराई प्रतिनिधी

बायकोला आणि मुलीला शिवीगाळ केल्या प्रकरणी जाब विचारण्यासाठी गेलेल्या सचिन भोले यास गावातीलच राजु शेख याने शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिली,इतकेच नव्हे तर तुझ्या बायकोला उचलून घेवून जाईल तुला काय करायचे ते कर अशा शब्दात धमकी दिल्या प्रकरणी तलवाडा पोलीस स्टेशन मध्ये सचिन भोले रा. गोळेगव यांच्या फिर्यादी वरून अनु .जाती अनु जमाती प्रतिबंधात्मक कायद्या अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला.

सचिन भोले आणि त्याची पत्नी व मुलगी गोळेगाव येथे मजुरी करून आपली उपजीविका भागवतात या कुटुंबाला गावातीलच शेख राजु याने त्रास दिला असून सचिन यांच्या घरी जाऊन सचिन भोले यांच्या पत्नीला आणि मुलीला १६ मे रोजी शिवीगाळ केली. सचिन संध्याकली कामावरून घरी आल्यावर बायकोने आणि मुलीने घडलेला प्रकार सांगितला नंतर दुसऱ्या दिवशी सकाळी गावातील चौकात शेख राजु याला सचिन ने तू माझ्या घरी येऊन बायकोला शिवीगाळ का केली असा जाब विचारला असता राजु याने उलट त्यालाच अश्लील भाषेत शिवीगाळ करत जातीवाचक शिव्या दिल्या इतकेच नव्हे तर तुझ्या बायकोला उचलून घेवून जाईल असे धकावत तुला काय करायचे ते कर म्हणत जिवे मारण्याची धमकी दिली.या प्रकरणी सचिन भोले यांनी तलवाडा पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली असून त्यांच्या फिर्यादी वरून आरोपी शेख राजु यांच्या विरोधात अनु.जाती अनु जमाती प्रतिबंधात्मक कायद्या नुसार कलम ३(१), कलम ३(१), ५०४, ५०६, अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी श्री निरज राजगुरू हे करत आहेत.

वसंतदादा पाटील महाविद्यालयाची यशाची परंपरा कायम-बारावीचा ९६ टक्के निकाल

पाटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्थेच्या वसंतदादा पाटील महाविद्यालयाने यावर्षीही बारावीच्या निकालात उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयातील विज्ञान शाखेचा निकाल ९९.५७ %, कला शाखेचा ८५.१८%, वाणिज्य शाखेचा ९२.५९% तर व्यवसाय अभ्यासक्रम शाखेचा १००% निकाल असून एकूण सरासरी ९६.३४ % निकाल लागलेला आहे.

महाविद्यालयातील यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्था सचिव डॉ. भारतभूषण क्षीरसागर, उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर, सहसचिव डॉ. योगेश क्षीरसागर, डॉ. सारिका क्षीरसागर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे, उपप्राचार्य डॉ.किशोर मचाले, डॉ. गणेश पाचकोरे, डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर संचालक डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, आयक्युएसी समन्वयक डॉ.मनोजकुमार प्रकाश, ग्रंथपाल प्रा.जगन्नाथ पटाईत, कार्यालय अधीक्षक अशोक पवार व महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

दिंद्रुडच्या सर्वच उच्च माध्यमिक विद्यालयांनी निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखली

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व इंदिरा गांधी कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने इयत्ता बारावी परीक्षेत निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखत भरघोस यश संपादन केले. उच्च माध्यमिक विद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के तर कला शाखेचा ९५.७७ टक्के निकाल लागला असून, इंदिरा गांधी कन्या उच्च विद्यालयाचा बारावी कला शाखेचा निकाल ८७.५० टक्के लागला आहे.प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी दिंदूच्या सर्वच महाविद्यालयांनी निकालाचा चढता आलेख कायम ठेवला आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय दिंद्रुड येथील विज्ञान शाखेत प्रथम येण्याचा मान कु.अनुजा शिवाजी सोळंके (८७.८३%) हिने मिळवला आहे. चि.काशिद जयंत अशोकराव (८७.८३%) द्वितीय, तर बिलपे मकरंद भगवान (८७.१७%) तृतीय, कु.दूधाळ प्रियल अंकुश (८६.८३)चौथा, चि.खेत्रे समर्थ संतोष (८६.६७%) असे क्रमांक मिळवले आहेत.

कला शाखेतील गांधले निकीता रामचंद्र ही ८२.८३% गुण मिळवून प्रथम आली आहे. तर गवळी ज्ञानेश्वरी शिवहार (८०.६७%) व अमृता धनंजय सोळंके (७९.१७%) हे हे दोघे अनुक्रमे द्वितीय व तृतीय आले आहेत. या विद्यालयाचे ८४ विद्यार्थी विशेष प्राविण्यात तर १२१ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. या सर्वाचे सिंदफणा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शिवाजी भाऊ रांजवण, सचिव प्रतापभैय्या रांजवण, विद्यालयाचे प्राचार्य जी.व्ही उजगरे, पर्यवेक्षक पी.जी. लखमावाड तसेच सर्व शिक्षक व शिक्षीका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे. इंदिरा गांधी कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनी दरवर्षीप्रमाणे यावर्षी निकालात भाजी मारली आहे. या महाविद्यालयाच्या १० मुली विशेष प्राविण्यात उत्तीर्ण झाल्या असून प्रथम श्रेणीत ३१तर द्वितिय श्रेणीत ०८ विद्यार्थिनीनी यश संपादन केले आहे. विद्यालयातून कु.काटे दिपाली हीने ८४ % गुण घेऊन प्रथम तर कु.सोळंके अमृता (८३.८३ %) हिने द्वितिय व कु.शिंदे लक्ष्मी (८०.६७ %) या विद्यार्थिनीने तृतिय क्रमांक पटकावला आहे. विद्यार्थीनींनी मिळविलेल्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.आ.मोहनराव (काका) सोळंके, सचिव सोळंके आर. व्हि., प्राचार्य बोचरे ए.व्हि., प्राध्यापक वर्ग, सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थीनींचे अभिनंदन केले असून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

नवजीवन संगोपन केंद्र येथील गोरगरीब मुलांना कुलरची भेट

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात नवजीवन फाउंडेशन संचलित नवजीवन संगोपन केंद्र येथे अनाथ, निराधार,ऊसतोड मजूर, वीटभट्टी कामगार,आदिवासी, भटके विमुक्त,गरीब, वंचित, दुर्लक्षित घटकातील मुलांचा मोफत सांभाळ करून शिक्षण दिले जाते.या नवजीवन संगोपन केंद्रास शासनाचे कोणत्याही प्रकारचे अनुदान किंवा मदत मिळत नाही सदरील केंद्र समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्यातून आणि मदतीतून चालवले जात आहे.

या अनाथ, निराधार मुलांना उन्हाची तीव्रता जास्त असल्यामुळे एक कुलर ची खूप गरज होती.म्हणून फुल ना फुलाची पाकळी मदत व्हावी. तसेच आपणही समाजाचे काही देणे तरी लागतो या उदात्त भावनेने आष्टी येथील सुप्रसिध्द दंतरोग तज्ञ आणि नेहमीच सामजिक कार्यास हात देऊन सहकार्य करणारे डॉक्टर सय्यद हुमयुद्दिन यांनी उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे आणि वातावरणात खूप गर्मी असल्यामुळे नवजीवन संगोपन केंद्र येथील गोरगरीब,अनाथ निराधार मुलांना एक कुलर देऊन सामाजिक बांधिलकी जपत या मुलांची उन्हापासून सुरक्षा व्हावी या उदात्त भावनेने मदत केली.डॉ.सय्यद हुमायुद्दीन हे सुप्रसिध्द कवी प्रा. अल्लाउद्दीन सरांचे पुत्र आहेत सरांनी आपल्या मार्गदर्शनाने अनेक

विद्यार्थी घडवले.तसेच आपल्याही मुलांना योग्य मार्गदर्शन करून,शिक्षण देऊन डॉक्टर बनवले.आपल्या वडीलांप्रमाने डॉ.हुमायुद्दीन हे सुद्धा नेहमीच सामजिक कार्यास हातभार लावून सहकार्य करतात नुकतेच त्यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून आष्टी येथे दंतरोग तज्ञ म्हणून आपल्या व्यवसायाला सुरुवात केली आहे त्यांच्या हातून गोरगरीब रुग्णांची सेवा घडो त्यांच्या या कार्यास नवजीवन संगोपन केंद्र आष्टी येथील अनाथ निराधार मुलांच्या वतीने हार्दिक शुभेच्छा दिल्या व कार्यक्रमाच्या शेवटी नवजीवन संगोपन केंद्र संस्थापक अध्यक्ष विकास म्हस्के मेजर यांनी सर्वांचे मनापासून आभार मानले.

उच्च माध्यमिक विद्यालय तलवाडा इयत्ता बारावी विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के

तलवाडा । प्रतिनिधी

आज माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांनी फेब्रुवारी /मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक शालांत परीक्षा, बारावीचा निकाल घोषित केलेला आहे . त्यामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तलवाडा या विद्यालयातील इयत्ता १२ वी विज्ञान शाखेतून १८४ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते त्यापैकी सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, विज्ञान शाखेचा निकाल १०० % तर कला शाखेचा निकाल ८७.९०%लागला आहे . कला शाखेतून १२४ पैकी १०९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तर कला व विज्ञान शाखेतुन विशेष प्राविन्याने ५३ तर प्रथम श्रेणीत १४२ व द्वितीय श्रेणीत ८८ व तृतीय श्रेणीत १० विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. शिवाजीराव (दादा) पंडित ,अध्यक्ष मा. अमरसिंह पंडित, सचिव मा .जयसिंह पंडित , मा . विजयसिंह पंडित, युवा नेतृत्व रणविर (काका) पंडित , जयभवानीचे संचालक डॉ .मराठे साहेब ,गणपत नाटकर ,आमचे मार्गदर्शक डावकर सर, प्रशासकीय अधिकारी तथा शाळेचे प्राचार्य प्रमोद गोरकर सर,गोगुले सर ,हातोटे सर , तसेच हाटकर सर, उच्च माध्यमिक विभाग प्रमुख प्रा. भोसले सर, प्रा. काकडे सर, पैठणे सर, पाठक सर, पाटील सर, तौर सी.बी.,तौर व्हि.पी. वाघमारे सर, गिरे सर, पवार सर ,शिंदे सर ,गांधले मामा सह सर्व कर्मचारी व गावकरी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

पार्वती लक्ष्मणराव लांडगे यांचे निधन

नेकनूर । प्रतिनिधी

भीम नगर नेकनूर येथील पण सध्या त्या बीड येथे रहिवासी होत्या निखळ व सोज्वळ स्वभाव असलेल्या पार्वती लक्ष्मणराव लांडगे यांचे (२०) मे रोजी चिंतामनी हॉस्पिटल,बीड येथे निधन झाले आहे . अशी घटना घडल्याने परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जाऊ लागली आहे या घटनेमुळे लांडगे परिवारावर दुःखाचे सावट निर्माण झाले आहे. त्यांनी चिंतामनी हॉस्पिटलमध्ये उपचार घेतावेळेस अखेरचा स्वास घेतला त्या अनंतात विलीन झाल्या तेव्हा त्यांचे वय हे ८३ होते .

भीम नगर नेकनूर याठिकाणच्या रहिवासी अतिशय प्रेमळ व स्वजवळ स्वाभावाच्या असलेल्या पार्वती लक्ष्मणराव लांडगे यांचे (२०) मे रोजी चिंतामनी हॉस्पिटलमध्ये दुःखद निधन झाले. त्यांचे निधन झाल्याने परिसरातील एक वेगळ्या प्रेमळ भावनेची पोकळी निर्माण झाली आहे . नेहमी हसरा चेहरा व प्रेमळ बोलीभाषा अशी त्यांची ओळख सांगता येईल . पार्वती लांडगे यांनी अखेरचा स्वास घेतला तेव्हा त्यांचे वय ८३ होते . त्यांच्या पाश्च्यात चार मुली जावई,व नातवंड असा परिवार आहे . पार्वती लांडगे यांचा सावडण्याचा कार्यक्रम (२२) मे रोजी व दूपारी १२ वाजता जलदान विधी कार्यक्रम संपन्न होईल.

केज विधानसभा मतदारसंघामध्ये कोणत्या उमेदवाराला मिळणार लीड?

राष्ट्रवादी काँग्रेस-भाजपात चुरस, केज तालुक्यात झाले २,६२,८७९ मतदान

अंबाजोगाई । नागनाथ वारद

केज विधानसभा मतदासंघातील एकूण ४१३ बुथवर १३ मे ला तुरळक प्रकार वगळता मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. परंतु, निवडणुकीच्या दुसऱ्या दिवशीपासूनच निकालाबाबत चर्चाचे फड रंगले. या विधानसभा क्षेत्रात ८२.६९ टक्के मतदान झाले. त्यामुळे या वाढलेल्या मतदानाच्या टक्केवारीवरून विजयासाठी प्रत्येक पक्ष दावे-प्रतिदावे करीत आहेत. वाढलेल्या टक्केवारीमुळे कोणाचे पारडे जड ठरणार, याची प्रतीक्षा सर्वांनाच लागली आहे. त्यातच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांचा केज बालेकिल्ला समजला जात असल्याने या मतदारसंघाकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे.

२३२ - केज विधानसभा मतदारसंघ मतदान आकडेवारी३,७३,८७९ एकूण मतदान २,६२,८७९ झालेले मतदान ७२.६९%

३ जूनपर्यंत सर्वच उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले आहे

पालकमंत्री असताना बीड जिल्ह्यासाठी भरघोस निधी आणला. ग्रामीण रस्ते, पाणीपुरवठा योजना असे अनेक महत्वपूर्ण फाने त्यांनी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून पंतप्रधान केंद्र सरकारने विविध योजना राबविल्या, मतदारसंघात राज्य सरकारच्या निधीतून होणारी हजारी कोटीची विकासकामे या सर्व भाजप उमेदवाराच्या अभेच्या -आ.नमिता मुंदडा, केज विधानसभा मतदारसंघ,मात्र आता प्रमुख पक्ष आम्हीच जिंकणार जसे दावे-प्रतिदावे करीत आहेत. खरी लढत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट व भाजपमध्ये असल्याच्या चर्चेने फड रंगत आहेत. परंतु, राजकीय पक्ष मात्र आम्हीच आघाडीवर राहणार असल्याचे सांगत सुटले आहेत. विशेष म्हणजे, अनेक

बजरंग सोनवणे यांनी सह दुसऱ्या वेळी लोकसभा निवडणूक लहविल्याने जिल्हाभरात त्यांचा मोठा जनसंपर्क राहिला. सलग २० वर्षे मुंडे कुटुंबाकडे खासदारकी राहिली, तरीही विकास झाला नाही. रेल्वेसह इतर प्रश्नही मार्गी लागले नाही विकास कामे होत नसल्यानेच जनतेने बजरंग सोनवणे यांना पाठबळ दिले, पृथ्वीराज माती आमदार,केज विधानसभा मतदारसंघ

मतदान केंद्रांवर मतदान यादीत मतदारांची नावे गहाळ झाल्याचे दिसून आले.

परिणामी अनेक नागरिक मतदानापासून वंचित राहिले, नाहीतर पुन्हा मतदानाची टक्केवारी वाढली असती, सताधारी पक्षाकडून केंद्र सरकारने महिलांसाठी सुरू केलेल्या योजना, याशिवाय शेतकऱ्यांना वार्षिक अनुदान आदीमुळे मतदानाचा टक्का वाढला,असा दावा केला आहे. तर दहा वर्षात विकास कामे झाली नाहीत, त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस विजया वर शिक्कामोर्तब करीत आहे.

ऊसाचे राजकारण

केज विधानसभा मतदारसंघात शेतकरी ऊस उत्पादक मोठ्या प्रमाणावर आहेत.या परिसरात बजरंग सोनवणे यांच्या येडेश्वरी साखर कारखान्याने परिसरातील उसाला चांगला भाव दिला. याउलट मुंडे बंधू-भगिनीच्या तिन्ही कारखान्यांचा गळीत हंगाम बंद राहिला. ऊस उत्पादक शेतकयांना दिलासा कोणी दिला? हा मुद्दा निवडणुकीत चर्चेचा ठरला.राष्ट्रवादी पक्षाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना किती वाढ मतदान मिळेल? तर वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांच्या मतांचा फटका कोणाला बसणार याचे आखाडे बांधले जात आहेत.

जातीय समीकरणांची जुळवाजुळव

या वर्षीची लोकसभा निवडणूक गाजली ही जातीय समीकरणांवरच. यात मराठा आरक्षणाचा मुद्दा कळीचा ठरणार असल्याचे बोलले जात आहे. दुसरीकडे मराठा समाज एकवटल्याने ओबीसी समाज एकत्र आल्याचे बोलल्या जाते. मात्र विकासापेक्षा अजूनही जातीय समीकरणांचीच गणिते जुळविली जात आहेत.

तेलगाव रोडवरील भारतीय स्टेट बँकेच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांची मनमानी

खातेदार वैतागले; दुपारी चार वाजताच बँक कुलूप बंद

किल्लेधारुर । प्रतिनिधी

धारूर शहरातील तेलगाव रस्त्या वर असणारे भारतीय स्टेट बैंक शाखेत अधिकारी व कर्मचारी यांची मनमानी वाढल्याने खातेदार वैतागून गेले असून सकाळी साडेदहा ते चार हाच वेळ बैंक चा ग्राहकाचे कारभारा साठी करून बैंक कुलूप बंद करून ग्राहक व खातेदाराशी अरेरावीची भाषा सतत वापरी जात असल्याने सर्व खातेदार व ग्राहक वैतागून गेले असून तात्काळ वरिष्ठा अधिका-यानी येथील मनमानी कारभार तात्काळ थांबवावा आशी मागणी होत आहे.

धारूर शहरात भारतीय स्टेट बैंकेच्या दोन शाखा आहेत तेलगाव रस्त्या वर असणारी शाखा जुनी आहे शासकीय योजना व व्यापारी वर्गाचे या शाखेशी मुख्य व्यवहार आहेत मात्र गेल्या दोन तिन महीण्या पासून येथील अधिकारी व कर्मचारी यांचे गलथान व मनमानी कारभाराला सर्व ग्राहक व खातेदार वैतागून गेले आहेत खातैदाराच कुठलच काम वेळेवर होत नाही अरेरावी व मनमानी मात्र सहन करावी लागते. सकाळी दहा ते संडेपाच कार्यालयीन वेळ असताना पैशाचे व्यवहार ◀◀ पान ३ वर

व्यापाऱ्यांच्या वतीने पो.नि. केतन राठोड यांचा सत्कार

माजलगाव । प्रतिनिधी

मागील आठवडच्यात रस्त्यावर गुंडगिरी करून दहशत माजवणाऱ्या तसेच मेडिकल मध्ये घुसून कामगारांना मारहाण करणाऱ्या युवकांच्या मुसक्या आवळल्या बद्दल व्यापारी महासंघ व केमिस्ट असोसिएशन तर्फे पी आय केतन राठोड, तपास अधिकारी महादेव तोटेवाड आणि बिट अंमलदार गणेश तळेकर यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी केमिस्ट असोसिएशन चें अध्यक्ष विनोद शर्मा, माहेश्वरी सभेचे अध्यक्ष उमेश जेथलिया, शशिकीरण गडम, मोहन घुले, रिकब मुगदिया,राधेश्याम जेथलिया,राजेंद्र नावंदर, शेख जावेद, नवल बाहेती, राजू मालपाणी, नाना नायबल,डॉ नितीन जेथलिया, गणेश लोहिया,अतुल सोनी व इतर व्यापारी

अंबाजोगाईच्या जोधाप्रसादजी मोदी कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा बोलबाला

महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा ९९% तर कला शाखेचा ७६% निकाल

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा इयत्ता बारावीचा निकाल जाहीर झाला आहे. बीड जिल्ह्याने बारावीच्या निकालात सर्वप्रथम येण्याची परंपरा यंदाही कायम ठेवली असल्याचे निकालातून स्पष्ट झाले आहे. अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी देखील आपल्या महाविद्यालयाच्या यशाची परंपरा कायम ठेवली आहे. या महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा निकाल हा ९९% तर कला शाखेचा ७६% एवढा लागला आहे.

जोधाप्रसादजी मोदी कनिष्ठ महाविद्यालतील अनेक विद्यार्थ्यांनी बोर्डाच्या परीक्षेत विविध विषयात विशेष प्रविण्यासह ५ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत३७ तर द्वितीय श्रेणीत ५२ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. ज्यामध्ये विज्ञान शाखेत कु .तोष्णीवाल दिया निलेश या विद्यार्थिनीने ९०% गुण घेऊन महाविद्यालयात प्रथम तर कु. ठाकूर इशिता कृपालसिंग ८७% त्याचबरोबर ८०% गुण घेऊन परळकर सई श्रीकांत हिने महाविद्यालयातुन ◀◀ पान ३ वर

बीड : जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे यांनी शासकीय रुग्णालयातील नेत्रशस्त्रक्रिया विभागाला मंगळवारी भेट दिली. यावेळी शासकीय रुग्णालयाचे वर्ग-१ वैद्यकीय अधिकारी डॉ.संजय राऊत, नेत्र शस्त्रक्रिया विभागाचे प्रमुख डॉ.आर.आर.जाजू, डॉ.पारखे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी स्वागत केले. यावेळी साथरोग संशोधन करण्यासाठी परदेशात जाणाऱ्या वैष्णवी उदय पाटील या मुलीचे अभिनंदन करून तिला शुभेच्छाही दिल्या.

बॅडमिंटनपटूने चंपावती क्रिडा मंडळाचे कोर्ट गाजवले

प्रणव समुद्रे व साहिल खतीब ठरले सिंगल व डब्बल पुरस्कारांचा मानकरी

माजलगाव । प्रतिनिधी

बीड येथील चंपावती क्रिडा मंडळ येथे आयोजित केलेल्या १९,२० मे या दोन दिवसांच्या जिल्हास्तरीय अ स्पर्धात अंबाजोगाई येथील खेळाडूने या मंडळाचे कोर्ट चांगलेच गाजवले पाच बॅडमिंटनपटूने प्रथम क्रमांक मिळविला तर प्रणव समुद्रे व साहील खतीब यांनी सिंगल व डब्बल पुरस्कारांचा मान मिळावला.या यशा मुळे अंबाजोगाई सह माजलगावत या खेळाडुंचे अभिनंदन होत आहे

बीड जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन व चंपावती क्रिडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दि १९ व २० मे रोजी चंपावती क्रिडा मंडळ बीड येथे जिल्हा स्तरावरील बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेत अंबाजोगाई येथील बॅडमिंटनपटूंनी सह भाग घेतला होता या मध्ये ११ वर्षा खाली सिंगल गटात गौरी माने,१५ व १७वर्षा खाली सिंगल गटात श्रुती रंधवे,१३ वर्षा खाली सिंगल गटात विराज शिंदे,१५वर्ष वयो सिंगल गटात प्रणव समुद्रे,१७ते १९ वर्षा खाली सिंगल गटात साहील खतीब यांने ◀◀ पान ३ वर

रामेश्वर मानधने यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील शिवाजीनगर भागातील रहिवाशी असलेले रामेश्वर दगडु मानधने वय ८५ वर्षे यांचे वृध्दापकाळाने दि. २१ मंगळवारी निधन झाले.

स्व.रामेश्वर सेठ मानधने हे जुन्या पिढीतील एक निष्ठावान उपासक, शेतकरी व यशस्वी व्यापारी होते.राष्ट्रसंत संचारेश्वर पाचलेगावकर महाराजांच्या आशीर्वादाने व प्रेरणेने मोगर्यात सुरू झालेल्या सोमवार उपासनेत स्व.रामेश्वरभाऊंचा पुढाकार मोठा होता.गावातील सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांत त्यांचे योगदान महत्त्वाचे होते. त्यांच्या पार्थीवावर राजस्थांनी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. जय महेश कारखान्याचे कर्मचारी गोपाल मानधने यांचे ते चुलते होत.

पंतप्रधान कृषी सिंचन योजनेतील ४३६ शेतकऱ्यांचे ६३ लाख ९५ हजार रूपयांचे अनुदान रखडले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शेतकर्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र शासनाने पंतप्रधान कृषी सिंचन योजना अंतर्गत सन २०२२-२३ मधील तुषार सिंचन व टिबक सिंचनेतील खरेदी केलेल्या ४३६ शेतकर्यांना ६३ लाख ९५ हजार रूपयांचे अनुदान थकल्यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत सापडला आहे. कृषी मंत्र्यांच्या जिल्ह्यातच दिड वर्षापासुन शेतकर्यांना अनुदान मिळत नसल्यामुळे शेतकर्यांतून संताप व्यक्त केला जात आहे.

केंद्र सरकारने पोखरा योजने सारख्या विविध योजना शेतकर्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी तयार केल्या. या योजनेमुळे शेतकरी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेवू लागले. परंतु ज्या योजनेवर शासनाने अनुदान जाहिर केले आहे. ते अनुदान देण्यासाठी प्रशासन आकडता हात घेत असल्यामुळे शेतकर्यांमध्ये नाराजीचा सुर निघत आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना अंतर्गत सन २०२२-२३ मधील तुषार सिंचन व टिबक सिंचन योजनेच्या केवळ १७८ शेतकर्यांना २३ लाख ७४ हजारांचे अनुदान अदा केले आहे. यानंतर दिड वर्षात सरकारकडून अनुदान प्राप्त न झाल्यामुळे अंबाजोगाई तालुक्यातील ४३६ शेतकर्यांना ६३ लाख ९५ हजार रूपयांची रक्कम दिड वर्षापासुन प्रलंबित आहे. प्रत्येक योजनेचे अनुदान वेळेवर मिळाले तर शेतकर्यांना शासनाच्या योजनांचा फायदा घेण्यासाठी हूरूप येईल परंतु शासनाच्या हप्तर दिरंगाईमुळे या योजनांचा लाभ शेतकर्यांना मिळत नसल्याचे चित्र दिसून येत आहे. बीड जिल्ह्याला कृषी मंत्री खाते मिळाले असताना ही शेतकर्यांच्या प्रलंबित अनुदानाच्या संदर्भात प्रशासन ठोस उपाययोजन करेल की नाही हा प्रश्नचिन्हच आहे.

आ.धनंजय मुंडे यांना कृषी खाते मिळाल्यानंतर बीड जिल्ह्यातील शेतकर्यांना या खात्याचा मोठा फायदा होईल अशी अपेक्षा होती. परंतु प्रशासन गेंड्याची कातडी पांगरून बसलेला कृषी मंत्र्यांच्या जिल्ह्यातील शेतकर्यांना तरी न्याय देईल का असा प्रश्न शेतकर्यांतून प्रश्न उपस्थित केला जात आहे.

गेवराई बसस्थानक प्रवेशद्वारावर भला मोठा खड्डा

मोठ्या अपघाताची शक्यता; आगार प्रमुखाचे दुर्लक्ष

गेवराई । प्रतिनिधी

माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी त्यांच्या विधानसभा सदस्य कार्यकाळात गेवराई बस स्थानक अपुरे पडू लागले म्हणून नवे बस स्थानक मंजूर करून घेऊन तयार करून घेतले . मात्र हे सांभाळणे आगार प्रमुखाचे काम आहे . परंतु गेल्या सहा महिन्यापासून गेवराईच्या बस स्थानकाच्या प्रवेशद्वारावर भला मोठा खड्डा पडला असून आजूबाजूलाही छोटे छोटे खड्डे पडू लागले आहेत . त्यामुळे या ठिकाणाहून जाणाऱ्या बसेस खड्ड्यातून डुलत डुलत जात असल्याने एखादा मोठा अपघात झाल्यानंतर आगार प्रमुख याकडे लक्ष देणार आहेत काय ? आगार प्रमुख आगारातील कार्यालयात नुसते बसून राहत असल्याने त्यांना बस स्थानकावरील समस्या दिसत नाहीत . कोणतीही बस वेळ सोडली जात नाही, कोणतीही बस सूचना न देता बंद केली जाते, बसेसची दुरुस्ती, स्वच्छता आगारांमध्ये व्यवस्थित होत नाही . बसस्थानक रसवंती फ्रुट स्टॉल कॅन्टिन म्हणजे प्लॅटफॉर्म क्रमांक १ व २ पर्यंत प्रवाशांची दुचाकी - चारचाकी ◀◀ पान ३ वर

नाथ कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे बारावी परीक्षेत घवघवीत यश

वडवणी । प्रतिनिधी

नुकत्याच झालेल्या इयत्ता बारावीच्या वर्गाचा निकाल आज दिनांक २१ मे २०२४ रोजी जाहीर करण्यात आला असून यामध्ये नाथ कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९८.४५ % लागला आहे (विज्ञान शाखा ९९.१८ तर कला शाखा ९६.२०).दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नाथ कनिष्ठ महाविद्यालयाने आपली निकालाची परंपरा कायम ठेवली आहे.विज्ञान शाखेतून पुढील विद्यार्थ्यांनी क्रमशः यश संपादन केले आहे .यामध्ये विज्ञान शाखेतून चि. दुबाले संस्कार अनिरुध्द ९०.३३ (सर्वप्रथम), कु.गिराम प्रतीक्षा महादेव ९०.१७ (व्दितीय)तर कु.गिराम रेवती जगन्नाथ ८९.८३ (तृतीय)टक्के मार्क घेऊन उत्तीर्ण झाले आहेत.तर कला शाखेतून कु. काळे मयुरी रमेश ८३.३३ (सर्वप्रथम) कु त्रिभुवन मयुरी गिन्यानदेव ८१.५० (व्दितीय) कु. काळे प्रतिभा श्रीकृष्ण ८१.१७ ,कु.वरबडे दीक्षा भाऊराव ८१.१७(तृतीय) टक्के घेऊन उत्तीर्ण झाली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे श्री मदनराव नानासाहेब चव्हाण (माजी जि. प. सदस्य पिंपळनेर),नाथापूर ग्रा.पं.च्या सरपंच सौ. मयुरीताई सुंदरराव चव्हाण,उपसरपंच मा.सतीश बाप्पू शिंदे, मुक्ताराम भाऊ चव्हाण, महादेव साहेबराव गिराम, अंकुश गिरधारी चव्हाण, शेख चाँद, मा. सरपंच सुंदर भैया चव्हाण, नाथ कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री गोविंद चव्हाण सर, साईनाथ मतिमंद निवासी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री अशोक चव्हाण सर ,नाथ हायस्कूल नाथापूर चे मुख्याध्यापक श्री धुरवडे सर,, तसेच महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

खळबळून जाग आलेल्या महापालिकेच्या वतीने ५ अनधिकृत जाहिरात फलकांवर निष्कासनाची कारवाई

पुणे । प्रतिनिधी

मुंबई होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर राज्यभरातील होर्डिंग बाबत आवाज उठवला जात आहे. अनधिकृत होर्डिंग चा मुद्दा ऐरणीवर आला आहे. मात्र वारंवार सांगूनही प्रशासन दाद देत नसल्याचेही समोर आलं आहे. अशातच होर्डिंग कोसळल्याची आणखी एक घटना घडल्याने हा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. या दुर्घटनेत भरत साबळे (वय - ५७, रा. येरवडा, पुणे) आणि अक्षय कोरवी (वय -२७, रा. पुणे) हे दोघे जखमी झाले आहेत. याप्रकरणी अधिक माहिती अशी की, सोलापूर महामार्गाला लागून असलेल्या गुलमोहर लॉन्स या ठिकाणी एक कार्यक्रम होता. या कार्यक्रमासाठी पुण्यातील बँड पथक त्या ठिकाणी आलं होतं. दरम्यान कार्यक्रम सुरू असताना वाजंत्री वाजवत बसले होते. तर जवळच असणाऱ्या झाडाखाली घोडा बांधला होता.

या घटनेनं नंतर खळबळून जाग आलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शहरातील अनधिकृत जाहिरात फलक निष्कासनाची कारवाई सुरू केली आहे. महानगर पालिकेच्या 'इ' क्षेत्रिय कार्यालय क्षेत्रातील एकूण ५ अनधिकृत जाहिरात फलकांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. तसेच येत्या तीन दिवसांत शहरातील उर्वरित अनधिकृत जाहिरात फलकांवर निष्कासनाची कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिके च्या आकाशचिन्ह व परवाना विभागाच्या वतीने शहरातील जाहिरात फलकांचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. या सर्वेक्षणामध्ये आतापर्यंत अ (३), ब (५), क (३), ड (२), इ (५), फ (६) असे मिळून क्षेत्रिय कार्यालयांतर्गत एकूण २४ अनधिकृत फलक आढळले असून वाढीव ३२१ जाहिरात फलक आढळले आहेत.

पिंपरी चिंचवड शहरातील होर्डिंग्सबाबत महापालिका अधिकारी, जाहिरात फलक धारक यांच्यासमवेत शुक्रवार १७ मे रोजी बैठक संपन्न झाली. या बैठकीत आयुक्त शेखर सिंह यांनी फलकधारकांना अनधिकृत जाहिरात फलक दोन दिवसात हटविण्याबाबत तसेच अधिकाऱ्यांना याबाबत पुढील कारवाई करण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयनिहाय अनधिकृत फलकांवर निष्कासनाची कारवाई करण्याबाबत सूचना दिल्या होत्या, या कारवाईस आजपासून सुरूवात झाली.

३०२० चे २ फलक ४०२० चे २ फलक १५२० चा १ फलक असे एकूण ५ फलक आजच्या कारवाईत निष्कासित करण्यात आले. या कारवाई दरम्यान सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर, उप आयुक्त संदीप खोत, कार्यालय अधिक्षक ग्यानचंद भाट, परवाना निरीक्षक, मजूर, एमएसएफ जवान तसेच महापालिका सुरक्षा रक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते.

कोट - ३१ मे २०२४ पर्यंत होर्डिंग्स परवानाचे नूतनीकरण करावे अन्यथा कारवाई २०२४-२५ साठी होर्डिंग्स परवाना नूतनीकरण ३१ मे २०२४ पर्यंत करावे अन्यथा सदरचे होर्डिंग्स अनधिकृत समजून निष्कासनाची कारवाई करण्यात येईल अशी माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

क्षेत्रीय अधिकाऱ्यांना फेरपडताळणीबाबत सूचना

आज सकाळी आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली आकाशचिन्ह परवाना विभाग, शहर अभियंता, सर्व क्षेत्रीय अधिकारी व कार्यकारी अभियंता यांच्यासमवेत बैठक झाली. त्यावेळी त्यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी बुधवारपर्यंत आपआपल्या प्रभागातील अनधिकृत होर्डिंग्सचे सर्वेक्षण करण्याच्या व फेरपडताळणी करण्याच्या सूचना दिल्या.

कनिष्ठ संरचना अभियंत्यांची करण्यात येणार नेमणूक शहर अभियंता कार्यालयामार्फत स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी सर्टिफिकेटचा नमुना तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच फलक उभारण्यात आलेल्या जागेवर पाहणी करण्यासाठी २ कनिष्ठ संरचना अभियंत्यांची नेमणूक महापालिकेच्या वतीने करण्यात येणार आहे. यामुळे जाहिरात फलकाच्या संरचनात्मक लेखापरिक्षण प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासही मदत होणार आहे.

पुणे शहरातील पब व बार रात्री बारा वाजेच्या आत बंद करा

पुणे शहर शिवसेनेची मागणी

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात प्रसिद्ध व्यावसायिक विशाल अग्रवाल यांचा १७ वर्षीय अल्पवयीन मुलाने दोन आयटी अभियंत्यांना आपल्या आलिशान पोर्शे गाडीखाली चिरडले. ही घटना कल्याणी नगरमध्ये रविवारी (दि. १९) पहाटे तीनच्या सुमारास घडली. या घटनेनंतर शहर भाजपच्या शिष्टमंडळाने पोलीस आयुक्तांची भेट घेऊन निवेदन दिले. यानंतर आता पुणे शहर शिवसेनेच्या वतीने शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी रात्री बारापर्यंतच शहरातील पब व बार बंद करण्याची मागणी केली आहे.

कल्याणी नगर परिसरात हिट अँड रनच्या प्रकारात मद्यधुंद अवस्थेत आलिशान गाडी बेफामपणे चालवत तरुण-तरुणींना बेदरकार पद्धतीने उडविल्याबाबत गुन्हा नोंदविलेला आहे. सदर अपघात हा रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या पब व बार संस्कृतीमुळे घडला असून पुणे शहरातील सार्वजनिक स्वास्थ्य अबाधित राखण्यासाठी शहरातील पब व बार संस्कृतीला आळा घालण्यात अत्यंत आवश्यक आहे. शहरातील सर्व अधिकृत बार व पब हे रात्री १२ नंतर पूर्णपणे बंद असावेत जेणेकरून घडणाऱ्या घटना टाळता येतील अशी मागणी आज पोलीस आयुक्तांना शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

पुणे पोलिसांच्या माध्यमातून शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्या बाबतही पत्राद्वारे विनंती करण्यात आली आहे. पत्रावर शिवसेना सहसंपर्कप्रमुख अजय भोसले, शिवसेना शहरप्रमुख प्रमोद नाना भानगिरे, युवासेना सचिव किरण साळी, युवासेना शहरप्रमुख निलेश गिरमे यांच्या सह्या आहेत.

उजनी धरणात बोट पलटली, ६ जण बुडाले, पीएसआय पोहत-पोहत काठावर; रात्रीच्या अंधारात शोध सुरू

पुणे : नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी येथील धावली धरणात बुडून ५ जणांचा मृत्यू झाल्याची भीषण दुर्घटना दुपारी घडली असतानाच आणखी एक दुर्घटना समोर आली आहे. सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणात (क्षिळपळ ऊा) एक बोट बेपत्ता झाली असून ही दुर्घटना इंदापूर तालुक्यातील कळाशी येथील परिसरात घडली आहे. विशेष म्हणजे या बोटीतून पोलीस उपनिरीक्षक राहुल डोंगरे हे बोट पलटी झाल्यानंतर पोहत-पोहोचत कळाशी गावच्या काठावर पोहोचले आहेत. राहुल डोंगरे हे काढावर पोहोचल्यांतर या घटनेचा उलगडा झाला. त्यानंतर, पोलीस प्रशासनाने घटनास्थळी धाव घेत बोटीची शोधमोहिम सुरू केली आहे. या बोटीतून ७ जण प्रवास करत होते. त्यापैकी, राहुल डोंगरे हे सुरक्षीत आहेत. मात्र, बोटीतील इतर प्रवाशांचा शोध सुरू आहे.

इंदापूर तालुक्यातील कुगावं ते कळाशी या जलमार्गावरी ही बोट वाहतूक चालू होती. या बोटीतून एकूण ७ प्रवासी प्रवास करत होते. गावातील जोडपे, त्यांची दोन लहान मुले, एक पोलीस उप निरीक्षक, कूगाव येथील एक तरुण आणि बोट चालक, असे ७ प्रवासी संध्याकाळच्या सुमारास प्रवास करत होते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून बदलत्या हवामानाचा फटका बसल्याने ही दुर्घटना झाली. सायंकाळी सहाच्या दरम्यान सुटलेल्या वादळी वाऱ्याने बोट पलटली व सर्वच प्रवाशी पाण्यात बुडाले. यावेळी पोलीस उप निरीक्षकाने पाण्यात उडी टाकून स्वत:चा बचाव करण्याचा प्रयत्न केला. ते पोहत-पोहोत काठावर आले. त्यामुळे, या घटनेची माहिती मिळाली. मात्र, अद्यापही बोटीतून प्रवास करणारे इतर ६ जण बेपत्ता आहेत. दरम्यान, आता शोधकार्यासाठी प्रशासन घटनास्थळावर दाखल झाले असून २ तासानंतरही अद्याप बुडालेल्या एकाचाही शोध लागलेला नाही. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे घटनास्थळी पोहोचले आहेत. तर, खासदार सुप्रिया सुळे यांनी ट्विट करुन बुडालेल्या प्रवाशांसाठी प्रार्थना केली आहे.

मी बचाव कार्याचा आढावा घेत आहे - सुप्रिया सुळे

उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील कळाशी, ता. इंदापूर येथे आज सायंकाळी वाहतूक करणारी एक बोट उलटली. या घटनेत काहीजण बेपत्ता असून त्यांचा शोध घेण्याचे काम सुरु आहे. परंतु येथे मदत आणि बचावकार्य करण्यासाठी आणखी साधनसामग्रीची आवश्यकता आहे. जिल्हाधिकारी पुणे यांना विनंती आहे की आपण याची तातडीने दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी. सदर घटना अतिशय गंभीर असून येथील मदत आणि बचाव कार्याचा मी सातत्याने आढावा घेत आहे. याबाबत मी जिल्हा प्रशासनाच्या संपर्कात आहे. बेपत्ता असणारे सर्वजण सुखरुप असावेत ही ईश्वरचरणी प्रार्थना.

टेम्पो आणि कारची धडक, अपघातात चार जण जखमी

ओतूर । प्रतिनिधी

नगर-कल्याण महामार्गावरील कोळवाडी (ता. जुन्नर) गावच्या हद्दीत मंगळवारी (दि. २१) सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास ओतूरकडून कल्याण दिशेने जाणारी कार (एमएच १६एटी ९४२६) व कल्याणकडून ओतूरच्या दिशेने जाणारा टेम्पो (एमएच १४ एचजी ४९९१) या दोन वाहनांची समोरासमोर धडक होऊन चारजण जखमी झाल्याचे वृत्त हाती आले आहे.

या अपघातात सचिन भानुदास बेरड (वय ३४) ,आश्विनी सचिन बेरड (वय ४०), त्रिशा सचिन बेरड (वय ३), सर्व रा. नेहरूनगर भिंगार, जिल्हा अहमदनगर) तर टेंपोचालक विजय सुरेश नाडेकर (वय २६, रा. तळेरान. ता. जुन्नर) हे जखमी झाले आहेत.

अपघाताची माहिती मिळताच ओतूरचे सहायक पोलीस निरीक्षक लहू थाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक शामसुंदर जायभाये हे घटनास्थळी तात्काळ हजर झाले व जखमींना आवश्यक ती मदत करीत त्यांना आळेफाटा येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. दरम्यान धडक झालेल्या दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून या अपघातानंतर टेम्पो जागेवरच पलटी झाला.

पुणे अपघात प्रकरणी बाल न्याय मंडळाचा निर्णय धक्कादायक : फडणवीस

पुणे । प्रतिनिधी

येथे पोर्शे कार अपघात प्रकरणाची पोलिसांनी गंभीर दखल घेतली आहे. मी पोलिस अधिकाऱ्यांची बैठक घेऊन आत्तापर्यंत काय घडले आणि काय कारवाई केली जाईल, याचा आढावा घेतला. या प्रकरणी बाल न्याय मंडळाचा निर्णय धक्कादायक आहे, अशी माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज (दि.२१) पत्रकार परिषदेत दिली.

पालकांनी मुलांना योग्य दिशा देणे गरजेचे

पुणे आयुक्तालयात गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज (दि.२१) पत्रकार परिषद घेतली, यावेळी फडणवीस म्हणाले, पुणे येथील अपघातात एका तरुण अणि तरुणीचा झालेला मृत्यू ही घटना अस्वस्थ करणारी आहे. अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी पालकांनी मुलांना योग्य दिशा देणे गरजेचे आहे. आम्ही या घटेनची गंभीर दखल घेतली आहे. पोलिसांनी याप्रकरणी दुर्लक्ष केलेले नाही. या प्रकरणी राजकीय आरोप करणे चुकीचे आहे. पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यात योग्य कलमांचा वापर करण्यात आला आहे. मात्र बाल न्याय मंडळाचा निर्णय आमच्यासाठी धक्कादायक होता.

आरोपीवर प्रौढ म्हणून कारवाई केली जाणार

या प्रकरणातील आरोपीचे वय १७ वर्ष ८ महिने इतके आहे. तरी त्याच्यावर प्रौढ म्हणून कारवाई करावी अशी मागणी बाल बाल न्याय मंडळाकडे केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाचा हवाला देत आम्ही बाल न्याय मंडळाकडे पुन्हा याचिका दाखल केली आहे, असेही फडणवीसांनी सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले, अल्पवयीन मुलांना गाडी चालवायला देणे हा गुन्हा आहे. . त्याचबरोबर अल्पवयीन मुलांना ज्यांनी दारु दिली त्यांच्यावर कारवाई केली जाईल. बार, पब नियमांच पालन करतात का याची चौकशी केली जाईल असेही ते म्हणाले.

पुण्यातील मोक्का टोळीच्या मुसक्या आवळल्या, गावठी कट्टा, कत्तीसह धाराशिवमध्ये तिघांना अटक

पुणे । प्रतिनिधी

जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी पोलिसांसमोर मोठं आव्हान बनलं आहे. खून, दरोडे, मारामाऱ्या आणि गँगवारमुळे पुण्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यातच, दोन दिवसांपूर्वी बड्या उद्योगपतीच्या अल्पवयीन मुलाने दारु पिऊन भरधाव वेगाने कार चालवत दोन निष्पाप तरुणाईचा जीव घेतला. पुण्यातील या अपघातामुळे सर्वत्र संताप व्यक्त होत आहे, त्यातच दुसरकडी पुण्यातील जिल्ह्यातील दरोडखोरांना धाराशिव जिल्ह्यात अटक करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. धाराशिव पोलिसांनी ही कारवाई केली असून तीन जणांना अटकही करण्यात आली आहे.

पुणे जिल्ह्यातील मोक्का टोळीचा प्रमुख विनोद शिवाजी जामदरे व त्याचे इतर साथीदार येरमाळा परीसरात दरोडा टाकण्याच्या तयारीत असल्याची माहिती धाराशिवच्या स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने येरमाळा परीसरात रात्रीची गस्त सुरू केली होती.

दरम्यान, सोमवारी रात्रीच्या सुमारास धुळे-सोलापूर महामार्गावर चोराखळी गावाजवळील हॉटेल कामतजवळ ५ जण संशयीत आढळून आल्याने गस्तवरील पोलिसांनी चौकशी केली. पोलिसांकडून सखोलपणे विचारपूस होत असल्याचे लक्षात येताच आरोपींनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी, रात्रीच्या अंधारात पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलागत करत आरोपींच्या मुसक्या आवळल्या.

धाराशिव पोलिसांनी पाठलाग करुन पाच पैकी तीन आरोपींना ताब्यात घेतले. आरोपींकडी साहित्याची बारकाईने पाहणी केली असता गावठी पिस्तुल,एक कत्ती,एक कटावणी आढळून आली. दरम्यान, पोलिसांच्या गुन्हे पथकाने पकडलेली ही टोळी दरोडा टाकण्याच्या तयारीत असल्याची खात्री झाल्यानंतर तिघांना ताब्यात घेण्यात आले आहे. या टोळीत एकूण ५ जण होते, येरमाळा परिसरात दरोडा टाकण्याच्या प्रयत्नाता असताना पोलिसांनी त्यांना अटक केली. यावेळी, दोघांनी पोलिसांच्या हातावर तुरी देत पळ काढला. मात्र, तिघांना अटक करण्यात आली असून तिघांच्या तपासातून इतर दोन्ही आरोपींचा देखील पोलिसांनी शोध सुरू केला आहे.

सिरमची मलेरियावरील लस आफ्रिकेला रवाना

पुणे । प्रतिनिधी

सिरम इन्स्टिटच्यूट ऑफ इंडियाने मलेरियाची लस आफ्रिकेला पाठवली असून पहिल्या टप्प्यात ४३ हजार २०० डोस सोमवारी (दि. २० मे) रवाना करण्यात आले. मलेरियाविरुद्धच्या जागतिक लढ्यात हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. सिरम इन्स्टिट्यूटमध्ये यानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी भारतातील अमेरिकेचे राजदूत एरिक गार्सेटी, नफिल्ड डिपार्टमेंट ऑफ मेडिसिन युनिव्हर्सिटी ऑफ ऑक्सफर्डच्या डॉ. मेहरीन दाटू वकिली अधिकारी सिल्व्हिया टेलर आदी उपस्थित होते. आतापर्यंत सिरमने दरवर्षी १०० दशलक्ष डोसपर्यंतची क्षमता असलेले २५ दशलक्ष डोस तयार केले आहेत.

मलेरियावरील लसीच्या पहिल्या टप्प्यातील डोस शिपमेंट सेंट्रल आफ्रि कन रिपब्लिकला पाठवले जाणार आहेत. त्यानंतर पुढील काही दिवसांमध्ये दक्षिण सुदान आणि डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगोसारख्या इतर आफ्रिकन देशांना पाठवले जाणार आहे. 'सीएआर' क्षेत्रासाठी ठरवलेल्या एकूण १ लाख ६३ हजार ८०० डोसपैकी सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाच्या सुविधेतून ४३ हजार २०० डोस पाठवले आहेत. ऑक्सफर्ड विद्यापीठ आणि नोवोवॅक्सच्या मॅट्रिक्स-एम यांच्या सहकार्याने विकसित केलेली ही लस मलेरियाचा प्रादुर्भाव झालेल्या आफ्रिकेतील स्थानिक प्रदेशातील मुलांसाठी वापरण्यासाठी अधिकृत केलेली दुसरी मलेरिया लस आहे. या लसीला युरोपियन आणि विकसनशील देशांच्या क्लिनिकल ट्रायल्स पार्टनरशिप, वेलकम ट्रस्ट आणि युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँक यांचे सहकार्य मिळाले आहे.

पोर्शे कार अपघात: मुलगा दारू पितो हे वडिलांना माहीत होते!

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील कार अपघात प्रकरणातील अल्पवयीन आरोपीने तो दारू पीत असल्याचे मान्य केले आहे. धक्कादायक बाब म्हणजे मुलगा दारु पित असल्याचे त्याच्या वडिलांना माहित होते. तरीही त्यांनी त्याला अलिशान पोर्शे कार चालविण्यास दिली असल्याचे पोलीस तपासात स्पष्ट झाले आहे.

मद्यधुंद अल्पवयीन मुलाने भरधाव पोर्श कारने चालवत रविवारी (दि.१९) पुण्यातील दोन आयटी इंजिनिअरला चिरडले. अल्पवयीन आरोपीने पोलिसांना सांगितले आहे की, मी दारु पीत असल्याचे वडिलांना माहित होते. त्यांनीच मला कार दिली. या प्रकरणी दाखल गुन्ह्यात नमूद करण्यात आलं आहे की, आरोपीकडे वैध वाहन परवाना आणि कार चालवण्याचे वैध प्रशिक्षण नाही, हे माहित असुनही त्याच्या वडिलांना त्याला कार चालवायला दिली होती. त्याचबरोबर त्याला पार्टी करायला परवानगीही दिली होती. झींपशी



झळश्रश्रशी झींलहश

वडिलांसह पाच जणांवर गुन्हा

पोर्शे कार अपघातातील आरोपीचे वडील, 'ब्रह्मा ग्रुप'चे विशाल अग्रवाल यांच्यासह हॉटेल मालक प्रल्हाद भुतडा, व्यवस्थापक सचिन काटकर, हॉटेलचे मालक संदीप सांगळे, बार व्यवस्थापक जयेश बोनकर अशा चार जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. विशाल अग्रवाल यांना आज (दि.२१) सकाळी संभाजीनगर येथून अटक करण्यात अआली आहे.

कुटुंबीयांचा आक्रोश

पुणे अपघातातील अश्विनी कोस्टा व अनिस अवधिया यांच्या कुटुंबीयांनी मुलांचे मृतदेह पाहताच आक्रोश केला. अश्विनी ही मूळची मध्य प्रदेशमधील जबलपूर येथील आहे. तर अनिसची आई-वडील वृद्ध असून, अनिस हा त्यांचा एकमेव मुलगा होता. दोघांनीही त्यांचे कम्प्युटर सायन्सचे शिक्षण पूर्ण केले होते. या अपघाताने दोघांते नातेवाईक हादरले आहेत.

ही हत्या आहे, अपघात नाही

अनिशचे आजोबा आत्माराम अवधिया म्हणाले की, पुण्यातील प्रख्यात बिल्डरचा मुलगा किशोर ड्रायव्हरला जामीन मिळायला नको होता. या अपघातात दोन जणांचा जीव गेला, हे पूर्णपणे चुकीचे आहे. या अपघातातील आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, असे आमचे मत आहे. त्यामुळे आरोपींना दिलेला जामीन रद्द करण्यात यावा, अशी इच्छा मृत अनिश याच्या आजोबांनी व्यक्त केली आहे. अनिसचे काका अखिलेश अवधिया म्हणाले, अल्पवयीन आरोपी मद्यधुंद अवस्थेत होता आणि ताशी २४० किमी वेगाने गाडी चालवत होता. त्याच्याकडे ड्रायव्हिंग लायसन्स नव्हते. त्यामुळे 'ही हत्या आहे, अपघात नाही.